गुरुवार, 25 ऑगस्ट 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 28
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 25 AUGUST 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-28 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-8 ● PRICE-5

# बिहारमध्ये ‘महागठबंधन सरकार’वर शिक्कामोर्तब!

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी विधानसभेच्या विशेष अधिवेशनात आवाजी मतदानाने विश्वासदर्शक ठराव जिंकला आहे. जनता दल युनायटेडचे सर्वेसर्वा नितीश कुमार यांनी केंद्र सरकारवर हल्लाबोल करताच भाजपा आमदारांनी सभात्याग केला. विश्वासदर्शक ठरावापूर्वी भाजपा नेते विजय कुमार यांनी विधानसभा अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. सत्ताधारी आमदारांनी कुमार यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव मांडला होता.**



या विशेष अधिवेशनात विश्वासदर्शक ठरावावरील चर्चेदरम्यान बिहारचे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला. “ईडी, सीबीआय आणि आयकर विभाग हे सरकारचे तीन जावाई आहेत. जे भाजपाला शरण जात नाहीत, त्यांच्यावर या जावायांकडून दबाव आणला जातो”, असा आरोप यादव यांनी केला आहे. दरम्यान, बहुमत चाचणीआधी राजदचे प्रमुख लालूप्रसाद यादव यांच्या कार्यकाळात झालेल्या कथित नोकरी घोटाळ्याप्रकरणी सीबीआयने नेत्यांच्या घरावर छापेमारी केली आहे. काही आठवड्यांपूर्वी भाजपासोबत युती तोडल्यानंतर नितीश कुमार यांनी काँग्रेस, डावे पक्ष आणि राष्ट्रीय जनता दलासोबत महागठबंधन सरकार स्थापन केलं आहे. दरम्यान, बिहारमधील राजकीय स्थितीबाबत निवडणूक रणनीतिकार प्रशांत किशोर यांनी मोठं भाकित वर्तवलं आहे. पुढच्या निवडणुकांच्याआधी बिहारमधील चित्र पुन्हा एकदा बदललेलं दिसेल, असे किशोर यांनी म्हटले आहे.

## महत्त्वाची बातमी

### अतुल भातखळकरांचे उद्धव ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भाजपाचे आमदार अतुल भातखळकर यांनी शिवसेना पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया घरासमोर स्फोटकं ठेवणाऱ्या सचिन वाझेकडून ‘ब्रिफिंग’ घेत होते, असा घणाघाती आरोप भातखळकरांनी केला. तसेच हे महाराष्ट्राच्या इतिहासातील पहिलं उदाहरण असेल, असं म्हणत त्यांनी निशाणा साधला. ते बुधवारी (२४ ऑगस्ट) विधानसभा अधिवेशनात बोलत होते. अतुल भातखळकर म्हणाले, “अडीच वर्षे दलालांचं राज्य होतं आणि तुम्ही आज दीड महिन्याच्या सरकारवर बेछुट आरोप करत आहात.
सचिन वाझेला विसरलात का? तो शिवसेनेचा प्रवक्ता होता म्हणून विसरत आहात का? की त्याने काही आश्वासनं दिली होती म्हणून त्याला सेवेत घेतलं. सेवेत घेतलं तर घेतलं, सोबत त्याला तात्काळ गुन्हे शाखेत घेण्यात आलं. त्यातही महत्त्वाचं सीआययू युनिट देण्यात आलं. जेव्हा याच सदनात आरोप झाले तेव्हा सचिन वाझे म्हणजे ओसामा बिन लादेन आहे का असं विचारण्यात आलं, असं भातखळकर यांनी सांगितलं.

## चर्चेतली बातमी

### माझ्या बहिणीची हत्या झाली : भावाची तक्रार



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** टिकटॉक स्टार आणि भाजपा नेत्या सोनाली फोगट यांचं निधन झालं. पण त्यांचा मृत्यू हृदयविकाराच्या धक्क्याने झाला नसून त्यांची हत्या करण्यात आली आहे, असा दावा त्यांचे कुटुंबीय करत आहेत. अशातच त्याच्या भावाने गोव्यात पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. सोनालींचा भाऊ रिंकू ढाका यांनी काही लोकांवर सोनालीची हत्या केल्याचे आरोप केले आहेत. सोनाली फोगटच्या भावाने गोवा पोलिसांकडे औपचारिक तक्रार दाखल केली आहे. त्यामध्ये त्याच्या बहिणीची तिच्या दोन साथीदारांनी हत्या केल्याचा दावा केला आहे. रिंकू ढाका यांनी आरोप केला आहे की तिच्या मृत्यूच्या काही वेळापूर्वी सोनाली फोगट तिची आई, बहीण आणि अन्य एका नातेवाईकाशी फोनवरून बोलली होती. त्यांच्याशी बोलताना चिंतातूर वाट होती आणि तिने तिच्या दोन साथीदारांविरुद्ध तक्रार केली होती. दरम्यान, सोनालीच्या मृत्यूनंतर हरियाणातील त्यांच्या फार्महाऊसमधील सीसीटीव्ही कॅमेरे, लॅपटॉप आणि इतर महत्त्वाच्या वस्तू गायब झाल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

# काँग्रेसला मोठा झटका

## राष्ट्रीय प्रवक्त्यांनीच दिला राजीनामा !

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** गेल्या वर्षभरात काँग्रेस पक्षाला काही तरुण पण प्रभावी नेतेमंडळींनी रामराम ठोकल्यामुळे पक्षाला मोठे धक्के पचवावे लागले आहेत. यामध्ये ज्योतिरादित्य सिंदियांपासन जितीन प्रसाद यांच्यापर्यंत नेत्यांचा समावेश होता. आता काँग्रेसला अजून एक मोठा धक्का बसला असून पक्षाच्या राष्ट्रीय प्रवक्त्यांनीच राजीनामा दिला आहे. विशेष म्हणजे राजीनामा देताना त्यांनी पक्षात लाळघोटेपणा वाढत असल्याची टीका केली आहे. तसेच, समाजहितासाठी पक्षात निर्णय होत नसल्याचं देखील त्यांनी म्हटलं आहे. काँग्रेसमधील तरुण फळीतील नेतेमंडळी पक्ष सोडत असल्याचं चित्र यातून निर्माण झाल्याचं बोललं जात आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते जयवीर शेरगिल यांनी पक्षाध्यक्ष सोनिया गांधी यांना पत्र लिहून राजीनामा सादर केला आहे. या पत्रामध्ये शेरगिल यांनी पक्षातील बदललेल्या वातावरणाविषयी सडेतोड भूमिका मांडली आहे.
जयवीर शेरगिल यांनी राजीनामा पत्रामध्ये पक्षात लोकहितासाठी निर्णय घेतले जात नसल्याचं म्हटलं आहे. “मला हे सांगताना वाईट वाटत आहे की पक्षात आता लोकांच्या आणि देशाच्या हितासाठीचे निर्णय घेतले जात नाहीत. त्याऐवजी निर्णय प्रक्रियेवर काही विशिष्ट लोकांच्या स्वार्थी हेतूचा प्रभाव असल्याचं दिसून येतं. हे लोक लाळघोटेपणा करत असून प्रत्यक्ष वास्तवाकडे दुर्लक्ष करणारे आहेत”, असं शेरगिल यांनी पत्रात म्हटलं आहे. शेरगिल यांना गेल्या काही महिन्यांपासून पत्रकार परिषद घेण्यापासून रोखण्यात आल्याचं सांगितलं जातं. राजीनामा देताना ते पुढे म्हणाले, “काँग्रेस पक्षाची विचारसरणी आणि पक्षातील सध्याच्या निर्णय प्रक्रियेतील नेतेमंडळी हे आधुनिक भारताच्या दृष्टीने अपुरे पडत आहेत”, असं देखील ते म्हणाले.

# जयंत पाटलांची तुफान फटकेबाजी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या ४० आमदारांनी बंडखोरी केल्यामुळे राज्यात सत्तांतर झाले. सध्या राज्याचा कारभार शिंदे गट-भाजपा संयुक्तपणे पाहात आहेत. दरम्यान, सध्या सुरू असलेल्या राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये या सत्तांतर नाट्यावर खरपूस चर्चा होत आहे. आजदेखील (२४ ऑगस्ट) जयंत पाटील यांनी एकनाथ शिंदे यांची बंडखोरी आणि मंत्रीपद तसेच खातेवाटपावरून शिंदे गट-भाजपात असलेल्या नाराजीवरून टोलेबाजी केली. त्यांनी शिंदे गटातील आमदार संजय शिरसाट यांना कुठे ॲडजस्ट करणार, औरंगाबादची एक टोपी घेतली (अब्दुल सत्तार) दुसऱ्या टोपीवर (हरिभाऊ राठोड) अन्याय का? अशी मिश्किल टिप्पणी केली. “तुम्ही अब्दुल सत्तार यांना मंत्री केलं.
संदीपान भुमरे यांना मंत्री केलं. आता आमच्या संजय शिरसाट यांचं काय होणार? शिरसाट यांना काही चान्स आहे का? एका जिल्ह्यात दोन मंत्री झाले. संजय शिरसाट यांना कसं ॲडजस्ट करणार? हरिभाऊ रोठोड यांनी आरएसएसचं काम खूप वर्षे केलं. त्यांना एकदा विधानसभेचं अध्यक्ष केलं. त्यावेळी ते चिडले होते. औरंगाबाद जिल्ह्याची एक टोपी घेतली मग दुसरी टोपी का नाही घेतली? जी निष्ठेची टोपी आहे ती बाहेर ठेवली,” अशी टोलेबाजी जयंत पाटील यांनी केली. “आमच्या काँग्रेसच्या विचाराच्या माणसाला तुम्ही खांद्यावर घेतलं. अब्दुल सत्तार आमचे मित्र आहेत. ते २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत आमच्याच पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवणार आहेत. हरिभाऊ राठोड यांच्यासारख्या भाजपाच्या ज्येष्ठ नेत्यांचा यावेळी विचार का नाही केला?” असे मिश्किल भाष्य करत त्यांनी भाजपा तसेच शिंदे गटातील असंतुष्ट नेत्यांना डिवचण्याचा प्रयत्न केला. पुढे त्यांनी एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाची खुली ऑफर दिली.
“मनावर दगड ठेवून एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केलं आहे, असे चंद्रकांत पाटील एका बैठकीत म्हणाले होते. भारतीय जनता पक्षाने मनावर दगड ठेवून आमच्या शिंदे यांना मुख्यमंत्री केले असेल तर कुठलीही भानगड ठेवता आम्ही एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री होण्याची संधी देऊ. तुमच्यातील गुण पाहता तसे करण्यास कोणीही नकार देणार नाही,” असे मिश्किल भाष्य करत जयंत पाटील यांनी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदाची ऑफर दिली.

# लासूर स्टेशनचे कांदा मार्केट व्यापाऱ्यांनी पाडले बंद

आधुनिक केसरी न्यूज




गंगापूर : तालुक्यातील लासूर स्टेशन येथील कांदा मार्केट व्यापाऱ्यांच्या आडमुठ्या धोरणामुळे जिल्हाभरातून कांदा शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणला होता. दोन दिवसावर पोळा सण तोंडावर आला असल्याने बैलांच्या सजावटीसाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदी करण्यासाठी हाती पैसा नसल्याने जिल्हाभरातील शेतकऱ्यांनी मध्यरात्रीपासून लासूरच्या कांदा मार्केटमध्ये कांदा विक्रीसाठी आणला होता. मात्र व्यापाऱ्यांनी अचानक कुठलीही पूर्वसूचना न देता कांदा मार्केट बंद पाडले. त्यामुळे व्यापाऱ्यांच्या विरोधात शेतकरी आक्रमक झाले वं एका व्यापाऱ्यांची कांद्याची एक ट्रक मुंबई - नागपूर रस्त्यावर आडवी लावली व शेकडो शेतकऱ्यांनी रस्ता रोको केला.
दरम्यान शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मच्छिन्द्र सुरवसे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन शेतकऱ्यांना रास्ता रोको स्थगित करण्याची विनंती केली. यावेळी शेतकऱ्यांनी जोपर्यंत व्यापाऱ्यांचे लायसन रद्द होत नाही तोपर्यंत रस्ता रोको थांबणार नाही, अशी आक्रमक भूमिका घेतली. त्यानंतर पोलीस निरीक्षक सुरवसे यानी बाजार समितीच्या प्रशासनाशी चर्चा विनिमय केला व कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी सकारात्मक भूमिका घेत प्रशासनाला सहकार्य केले व रास्ता रोको स्थगित केला. याबाबतची माहिती सभापती रवींद्र पोळ, उपसभापती दादा पाटील चव्हाण,सचिव कचरू रणयेवले,संचालक मनिष पोळ,सुरेश जाधव,सावळीराम थोरात,वाल्मिक चव्हाण, सहाय्यक निबंधक प्रशांत गावंडे, डी. वाय.एस.पी प्रकाश बेले, धामोरीचे उपसरपंच रवींद्र पाटील चव्हाण, भाजपचे उपजिल्हाद्यक्ष अमोल जाधव,शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी नजीर शेख, युसूफ शेख, सर्व बिट अंमलदार,कर्मचारी यांना समजताच त्यांनी तात्काळ कांदा मार्केटला भेट दिली वं शेतकरी जास्तच आक्रमक होता त्यात स्थानिक व्यापाऱ्यांनी आडमुठी भूमिका धरत बाहेरगावी निघून गेले त्यामुळे सर्व व्यापाऱ्यांचे लायसन रद्द केले वं कांदा घेऊन आलेल्या प्रत्येक शेतकऱ्याला भाड्यापोटी एक हजार रुपये दिले वं शेतकरी नाराज होऊन घरी परतला.

कांदा व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना वेठीस धरण्याचा प्रकार आज पाहावयांस मिळाला बाजार समितीचा व्यापाऱ्यांवर अंकुश नसल्याचेही दिसते कारण असा प्रकार व्यापारी वारंवार करताना दिसून येत असूनही व्यापाऱ्यावर कुठलीही कारवाई करत नाही त्यामुळे पोळा सण दोन दिवसावर आलेला असताना व्यापारी व बाजार समितीच्या नाकर्तेणामुळे कांदा न विकता हिरमोड होऊन शेतकरी घरी परतला व बाजार समितीने एक हजार रुपये शेतकऱ्याला देऊन त्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत.

रवीद्र पाटील चव्हाण (शेतकरी धामोरी)

व्यापाऱ्यांनी कुठलीही पूर्वसूचना न देता कांदा लिलाव बंद ठेवला ही बाजार समिती वं शेतकऱ्यांची एकप्रकारे अडवणूक आहे त्यामुळे दोषी व्यापाऱ्यांवर लायसन काय कारवाई करायची यासाठी संचालक मंडळाची बैठक घेऊन जो निर्णय बैठकीत होईल टी कारवाई व्यापाऱ्यांवर करण्यात येईल.

रवींद्र पाटील पोळ (सभापती, बाजार समिती)




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## सारे जहाँ से अच्छा ...

आधुनिक केसरी

देश स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करीत आहे. तिरंग्याच्या तीन रंगात अवघा भारत रंगून गेला आहे. प्रत्येकाच्या मनात ' घर घर तिरंगा, हर घर तिरंगा..' हे शब्द गुंजत आहेत. अशा सगळ्या पार्श्वभूमीवर माझेही मन तीन रंगात रंगून गेले. याच विचारात रात्री झोपल्याने माझी स्वप्नेही तीन रंगात न्हाऊन निघाली. मी तिन्ही रंगांची सरमिसळ असलेला पोशाख परिधान केला होता. कन्याकुमारीजवळच्या समुद्रात जसे तीन समुद्रांचे पाणी वेगवेगळे पण एकत्र आल्याचा भास आपल्याला होतो त्याचप्रमाणे माझ्या मनामध्ये या तीन रंगांच्या लाटा उसळी घेत होत्या. मनाचा अवघा परिसर या तीन रंगांच्या प्रकाशात त्रिवेणी संगम झाला होता. केशरी, पांढरा आणि हिरवा. देशभक्तीचे अशोकचक्र अभिमानाने गतिमान झाले होते. एक दिव्य प्रकाशगोल माझ्या अंतःचक्षूंसमोर प्रकटला. त्यातून



अवतीर्ण झाले एक अंतराळयान. ते माझ्या घराच्या पुढे येऊन उभे ठाकले. त्यावर तिरंगा डौलाने फडकत होता. एक अज्ञात शक्ती जणू मला खेचून त्या यानाजवळ घेऊन गेली. जणू ते माझ्यासाठीच थांबले होते. यानाच्या बाहेर अंतराळवीरांचा पोशाख परिधान केलेले दोन सैनिक उभे होते. मला पाहताच त्यांनी मला अदबीने सॅल्यूट केला. ' आपल्याला अंतराळाची सफर घडवून आणण्याची आम्हाला आज्ञा झाली आहे. कृपया आपण चलावे, ' असे त्यांनी म्हटले. यानाचा दरवाजा आपोआप उघडला गेला आणि मला आतमध्ये बसण्याचा इशारा करण्यात आला. मी आतमध्ये स्थानापन्न होताच बाहेरील दोघे यानात शिरले आणि आपापल्या जागेवर स्थानापन्न झाले. माझ्या आसनाभोवती असणारे यांत्रिक पट्टे आपोआप आवळले गेले. मी माझ्या आसनावर सुरक्षित असल्याची जाणीव त्यांनी मला करून दिली. यानचालकाला सर्व काही आलबेल असल्याचा इशारा करण्यात आला. यानाचा दरवाजा पुन्हा आपोआप बंद झाला. प्रचंड आवाज करीत आता यानाने अवकाशात झेप घेतली. मी जमिनीपासून उंच उंच जात होतो. घरे हळूहळू लहान होत गेली.



## आनंदी पहाट

## आपण अपयशी ठरल्याचा विचार टाळावा

आधुनिक केसरी

सामान्य नकारात्मक संदेशांची काहीजण स्वतःच वारंवार पुनरावृत्ती करत असतात. काहीवेळा त्यांचे विचार असे असतात कि, "मी स्वतःच एक धोकादायक व्यक्ती आहे", "मी एक पराभूत व्यक्ती आहे", "मी कधीही काहीही बरोबर करत नाही", "कोणीही मला कधीही आवडणार नाही", मी एकमेव असा आहे कि जो अविचाराने वागतो". बहुतेक व्यक्ती या स्वरूपातील नकारात्मकता निर्माण करणाऱ्या विचारांवर, संदेशांवर विश्वास ठेवतात, ते कितीही असत्य किंवा अवास्तव असले तरीही. आपण ते वैयक्तिकरित्या घेतले आणि आपल्याबद्दल वाईट वाटेल किंवा त्याबद्दल रागही येईल?



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अशी मनाची समजूत करून घेतली तर तुम्ही छोट्या छोट्या गोष्टींना मोठ्या गोष्टींमध्ये बदल घडवून आणत असतात. प्रमाणापेक्षा जास्त विचार करण्याच्या नियमित पद्धतींमुळे चिंता, चिडचिड, पॅनीक अटॅक तसेच कमी भूक, झोपेची अनियमित पद्धत, उच्च रक्तदाब आणि बरेच काही होऊ शकते. जेव्हा स्वतःला समजूतदार ठेवायचे असते तेव्हा भावना महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. काळजी करणे आणि जास्त विचार करणे थांबवण्यासाठी मेंदूला फसवण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

अनाहूत विचार हे नैराश्य, पोस्ट-ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर, ऑब्सेसिव्ह कंपल्सिव्ह डिसऑर्डर, बायपोलर डिसऑर्डर, अमली पदार्थांचा वापर डिसऑर्डर आणि अगदी बर्नआउट किंवा तीव्र ताण यासह इतर मानसिक आजारांचेही लक्षणे दिसून येऊ शकतात. मेंदूतील रसायने गोंधळ निर्माण करणे, विस्मरण होणे आणि लक्ष विचलित करणे तसेच मानसिक स्पष्टतेचा अभाव तयार होणे हे या द्वारे दर्शविले जाते.अनेकदा हे सर्व जास्त काम करणे, झोप न लागणे, तणाव आणि संगणकावर जास्त वेळ घालवणे यामुळे देखील होऊ शकते.



आधुनिक केसरी

## सावळाच वाली | वैष्णवांचा ||

साजिरा गोजिरा | विठ्ठल सावळा ||
आत्म्याचा जिव्हाळा | विटेवरी ||१||

संसाराची माया | मोहात सापडे ||
दुःखाचेच कडे | भोवताली ||२||

स्वार्थाचे लिंपन | वृत्तीस फासले ||
तीने नासवीले | उभ्या जन्मा ||३||

भजनी कीर्तनी | रमले ना मन ||
आता आले भान | कृपा झाली ||४||

पंचमहाभूते | दिंडीत नाचली ||
सावळाच वाली | वैष्णवांचा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी


**कालाम्बुदालिललितोरसिकैटभारेर्**
**धाराधरे स्फुरतियातडिदङ्गनेव ।**
**मातुःसमस्तजगतां महनीयमूर्तिर्**
**भद्राणिमे दिशतु भार्गवनन्दनायाः ॥६॥**

मेघांच्या मालिकेमध्ये वीज चमकते, तसे कैटभशत्रु श्रीविष्णूंच्या मेघमालेप्रमाणे श्यामसुंदर वक्षस्थलावर जी प्रकाशित होते, जिने आपल्या आविर्भावाने भृगुवंशाला आनंदित केले आहे, जी समस्त लोकांची जननी आहे, त्या भगवती लक्ष्मीची पूजनीया मूर्ती मला कल्याण प्रदान करो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



## सगुणभजन

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

मित्रांनो एक ते दहाव्या ओवी पर्यन्त श्रोता किंवा याठिकाणी आपण भक्त असेही म्हणू शकतो तो अनेक विचारांने काहीसा गोंधळला होता असे दिसते. पण डोकं शांत ठेऊन व मनावर नियंत्रण ठेऊन समासाचा उलगडा करत गेले तर असं लक्षात येतं की 'परमार्थ' 'परमार्थ' म्हणजे नक्की काय हो?

तर गुरू जे सांगेल त्यावर पूर्ण विश्वास ठेऊन त्याप्रमाणे आपण वागणे म्हणजे परमार्थ होय. गुरूची आज्ञा शिरसावंद्य मानावी आणि सगुणोपासना मनापासून करावी. हे ऊत्तर ऐकून श्रोता म्हणाला,"गुरूदेवा,सगुण भजन करण्यात हेतु कोणता? ,श्रोत्यांनी तोच आक्षेप वेगळ्या पद्धतीने सांगितला आहे. सगुणोपासनेत काही उपकार घडतो का? त्यात काही साक्षात्कार होतो का? किंवा आपल्या प्रारब्धात जे लिहिले असते ते उपास्य देवतेने कधी पुसले आहे का? **(क्रमशः)**

## हे श्रीकृष्णा...

आधुनिक केसरी

"हे श्रीकृष्णा, हे जग तू कसं चालवतोस रे. सगळं कसं नियमात बसवुन सहजपणे!" नारदमुनींच्या प्रश्नावर मंदसं स्मित करून श्रीकृष्ण म्हणाला, "चल नारदा, आपण नदी किनाऱ्यावर बसू, गप्पा मारू." दोघंही चालत चालत नदीवर पोहोचले. कोवळ्याशा पण कोरड्या गवतावर श्रीकृष्णाने सहज अंग लोटलं व पाठीवर पहुडला आपल्या स्वानंदात. "नारदा, हे संपूर्ण विश्व फक्त इच्छांवर चालतं. प्रत्येक जीव जितक्या इच्छा करतो त्या सगळ्या पूर्ण करण्यासाठीचे त्याचे सर्व जन्म ओळीत एकामागोमाग एक तयारच असतात. पण त्याकरिता आवश्यक पुण्य जमेपर्यंत त्याच्याकडून आसक्तियुक्त शुभाशुभ सकाम कर्मे मग मी करवुन घेत असतो एक अथवा अनेक जन्मांमध्ये. मग जसजशी त्याच्या इच्छापूर्तिची कथा घटीत होण्याची वेळ जवळ येईल तेव्हा त्याच्या मनात मी प्रेरणा सोडतो तिथवर वृत्तीने, मनाने व शरीरानेही जाण्यासाठीच्या. आणि त्याकरिता त्याचा जन्म कुठे होईल हेही अर्थात आपोआपच आधीच ठरलेलं असतं. प्रत्येक क्षण व सर्व घटनांनी परिपूर्ण प्रारब्ध भोगण्यासाठीचा देह मिळण्याची व्यवस्थाही आपोआपच लावलेली असते. खरं तर मला काहीच करावं लागच नाही. कारण एकदा केलेली इच्छा जीवाला इच्छापूर्तीपर्यंत कुठल्या ना कुठल्या जन्मात आपोआपच घेऊन जात असते. कारण त्याची इच्छा करणारी ही आत्मशक्ती म्हणजेच माझी महामाया असते आणि ती जन्मोजन्मी त्याच्या सोबत रहाते व कल्पांतीही नष्ट होत नाही. कारण तो प्रत्येक जीव म्हणजेही मीच असतो ना. अरे नारदा, तू म्हणजेही मीच आहे रे. पण जोपर्यंत तुला एकही इच्छा आहे तोपर्यंत तू स्वतःला नारद समजत रहाणार. ज्या क्षणी तुला इच्छाच नसते त्या क्षणी तू नारायण असतोस. तू नारायण नारायण भजनात तल्लिन होतोस तेवढ्यापुरता तू नारायणच असतोस."

"बापरे श्रीकृष्णा, किती गहन आहे हे सगळं घडणं आणि तू किती सोपेपणाने मला समजवुन दिलंस रे. आता मला कळतंय की तू हे सूर्य, चंद्र, तारे ग्रह पृथ्वी कशाकरिता बनवली आहेस व हे सर्व अविरत कार्य करत आहेत ते लाखो जीवांच्या इच्छा पूर्ण



व्हाव्यात म्हणूनच ना रे. सूर्यांमुळे भूमीतून अन्न निर्माण होतं. पावसाद्वारे अन्नात सर्व आत्मे प्रवेश करतात मग विविध देहाला जातात. खरंच तुझी लीला अगाध आहे. पण मला सांग की इतकं सगळं सामर्थ्य असूनही तूझ्या अवताररूपात तू आता आहेस तरी तुला कुणी ओळखू शकत का नाही ते."

"नारदा, आठवतंय का तुला. एकदा तू मस्करीत मला म्हणालेलास की श्रीकृष्णा तुला इतक्या साऱ्या पत्नी आहेत आणि मला बघ ना तू असा एकटा ठेवला आहेस. नारदा तुला मी स्मरण करून देतो की तूच हे मागून घेतलेलंस. हा तुझा तिसरा जन्म आहे आणि या जन्मात तू मोकळा होशिल सर्व इच्छांमधून केवळ माझं भजन करून. तूच मागीतलेलंस की देवा मला संसार नको फक्त तुझी भक्ति दे. आणि आता तुझी भक्ति पूर्ण झाली आणि तू इच्छा केलीस बघ संसार करण्याची. पण मी परमेश्वर आहे. तुझी छोट्यात छोटी इच्छाही पूर्ण करीन मी आणि तुझी भक्तिही अढळ राहील."

**भूषण भन्साली**

"नको नको देवा मी एकटाच बरा आहे. पण मला कुतुहल होतं मनात म्हणून मी तुला मस्करीत तसं बोललेलो रे. क्षमा कर देवा मला."

"नारदा, घाबरू नकोस. मला अशक्य काही नाही. बरं मला तहान लागली आहे. जरा थोडं पाणी घेऊन ये ना प्यायला. ओंजळभर पुरेल मला."

नारद नदी काठावर पाणी आणण्यास आनंदाने गेला व ओंजळ पाण्याने भरून आणताना काय घडले त्याला कळलेच नाही व तो पाय घसरून पाण्यात पडतोय असे जाणवले त्याला. पाण्यात पडल्यावर नाकातोंडात पाणी गेल्यावर तो दोन क्षणांनंतर म्हणाला "श्रीकृष्णा वाचव रे.. " पण त्या दोन क्षणात भरपूर काही घडलं. सगळं दृष्यच बदललं. नारदाला श्रीकृष्णाचा व स्वतःचाही विसर पडला. नारद एक सुस्वरूप तरूण होता व त्याला अनुरूप अशी प्रेमळ पत्नी होती व तो एका चांगल्या घरात गृहस्थाचं आयुष्य जगत होता. त्याला अनेक मुलं झाली. पत्नीला संसारात मदत करताना त्याला ती मुलं सांभाळावी लागत. पत्नी सांगेल ती सारी मदत करावी लागे. हळुहळु त्याला त्या मुलांच्या सेवेचा, रडण्याचा उबग येवु लागला. बरं पत्नी त्याला एक क्षणही सोडत नसे. त्याला स्वतःसाठी असं जगता येतच नव्हतं. ना भजन ना पूजाअर्चा काहीच करायला त्याला वेळच कुठे होता. अशी अनेक वर्षे संसार केल्यावर त्याला संसार सोडून कुठे पळूनच जावं असं वाटू लागलं होतं आता.

(उर्वरित उद्याच्या अंकात)

# टोलनाके हद्दपार होणार ?



आधुनिक केसरी

चारचाकी गाड्यांमध्ये कंपनीने फीट केलेल्या नंबरप्लेट बसवण्याचा निर्णय आम्ही २०१९ मध्ये केला होता. त्यानुसार गेल्या चार वर्षात आलेल्या चारचाकी गाड्यांना या नंबरप्लेट बसवण्यात आल्या आहेत. आता टोलनाके काढून स्वयंचलित नंबर प्लेट रीडर कॅमेरा बसवण्यात येणार आहे. हे कॅमेरे गाडीच्या नंबरप्लेटवरील नंबर वाचून त्याला जोडण्यात आलेल्या बँक खात्यातून पैसे वजा होतील, अशी माहिती नितीन गडकरी यांनी दिली. ते पुढे म्हणाले, आम्ही या योजनेचा चाचणी प्रकल्प सुरू केला आहे. मात्र, यात काही त्रुटी आहेत. जर वाहन चालकाने कॅमेरा चुकवण्याचा प्रयत्न केला किंवा बँक खात्यात पैसे नसेल, तर त्याबाबत काय शिक्षा असेल, यासंदर्भात आपल्याला कायद्यात सुधारणा कराव्या लागताली. तसेच ज्या गाड्यांना या विशिष्ट नंबर प्लेट नसतील त्यांना नंबर प्लेट बसवण्यासाठी नियम करावे लागतील. यासाठी आपल्याला कायदा आणावा लागेल. सद्यस्थितीत ४० हजार कोटींच्या एकूण टोलवसूली पैकी ९७ टक्के रक्कम फास्ट टॅग द्वारे होते आहे. उर्वरित 3 टक्के रक्कम सामान्य टोल दरांपेक्षा जास्त पैसे देणाऱ्याकडून येते. फास्ट टॅग लावल्यास टोल प्लाझा ओलांडण्यासाठी एका वाहनाला सुमारे ४७ सेकंद लागतात असेही ते म्हणाले. भारतातील राष्ट्रीय महामार्गावरील टोलनाके हटवून त्या जागी स्वयंचलित नंबर प्लेट रीडर कॅमेरा बसवण्याची सरकारची योजना आहे. हे कॅमेरे वाहनांच्या नंबर प्लेट्स वाचतील आणि वाहन मालकाने नंबर प्लेटला जोडलेल्या बँक खात्यातून पैसे वजा करण्यात येतील. या योजनेमुळे टोलनाक्यांवर होणारी गर्दी आणखी कमी होण्याची शक्यता आहे. मात्र, ही योजना कशाप्रकारे अंमलात आणल्या जाते, यावर अनेक गोष्टी अवलंबून आहेत.

# चंद्रावर शेतीची तयारी



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**गेल्या शतकापासूनच अंतराळात मानवी वस्ती स्थापन करण्याची तयारी जोरात सुरू आहे. पण त्याची व्यवस्था करताना सर्वात मोठी समस्या मानवाच्या अन्न आणि आरोग्याची आहे. त्यामुळे शेतीबाबत अवकाशात अनेक प्रयोग सुरू आहेत. अंतराळात जिथे माणूस जगू शकत नाही, तिथे मुळा, गहू लागवडीसारखे मोठे प्रयोग करण्याचा विचार केला जात आहे.नासा व्यतिरिक्त चीननेही या दिशेने पावले उचलली आहेत. त्याने अंतराळात विविध प्रकारचे गहू लुयुआन-502 लागवड करून सिद्ध केले आहे की एक दिवस माणूस या कार्यातही यशस्वी होईल. याआधी नासानेही असे यशस्वी प्रयोग केले आहेत. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकामध्ये मुळा वाढवण्यातही नासाच्या शास्त्रज्ञांना यश आले.**

वास्तविक, आज नासा व्यतिरिक्त इतर देशांच्या अवकाश संस्थाही या ब्रह्मांडाच्या दीर्घ प्रवासाची तयारी करत आहेत. यासोबतच असे संशोधनही सुरू आहे की ज्याअंतर्गत अंतराळवीर चंद्रावर किंवा इतर ग्रहांवर दीर्घकाळ राहू शकतात. मात्र यामध्ये सर्वात मोठा अडथळा अंतराळवीरांच्या भोजनाची व्यवस्था होण्याबाबत आहे. आतापर्यंत, अंतराळवीर केवळ थोड्या काळासाठी अंतराळात पाठवले जातात, जे पृथ्वीवरून सोबत स्वतःसाठी अन्नपदार्थ देखील घेऊन जातात. परंतु अंतराळवीर प्रवाशांना चंद्रावर जास्त काळ राहायचे असेल किंवा मंगळावर प्रवास करायचा असेल तर अन्नाच्या समस्येवर उपाय शोधावा लागेल. यासाठी त्यांना मोठ्या प्रमाणात अन्न न्यावे लागते, जे व्यावहारिक दृष्टिकोनातून शक्य नाही. त्यामुळे अंतराळातच अन्नाची व्यवस्था करण्याच्या पर्यायांवर वेगाने काम सुरू आहे. अंतराळातील शेती हा यापैकी एक पर्याय आहे.

एक समस्या अशी आहे की लांब अंतराळ प्रवासात, प्रवासी दीर्घकाळ एकच किंवा फक्त काही ठराविक पदार्थ खाऊ शकत नाहीत. यासाठी त्यांना अधिक वैविध्यपूर्ण अन्नाची आवश्यकता असेल. उदाहरणार्थ, मंगळावर पोहोचण्यासाठी अनेक महिने लागतील. त्यामुळेच नासाने आंतरराष्ट्रीय अवकाश केंद्रातच अनेक प्रकारचे खाद्यपदार्थ तयार करण्याचे किंवा पिकवण्याचे प्रयोग सुरू केले आहेत. अलीकडे मुळा पिकवण्यात यश आले आहे. अंतराळवीरांनी पृथ्वीच्या बाहेर अत्यंत कमी गुरुत्वाकर्षणात वनस्पती वाढवण्यास सक्षम व्हावे अशी नासाची इच्छा आहे.त्यादृष्टीने वेगाने प्रयत्न सुरू आहेत.नासाच्या अंतराळवीर केट रुबिन्सने गेल्या वर्षी 30 नोव्हेंबर 2021 रोजी आंतरराष्ट्रीय अंतराळ केंद्रात प्रथमच मुळा पिकवला. या प्रयोगाला प्लांट हॅबिटॅट-02 असे नाव देण्यात आले. मुळा एका खास चेंबरमध्ये (ॲडव्हान्स्ड प्लांट हॅबिटॅट चेंबर) वाढवला होता. या चेंबरमध्ये एलईडी दिवे आणि नियंत्रित कंपोस्टिंगमुळे पाणी, पोषण आणि ऑक्सिजन वनस्पतीच्या मुळांपर्यंत सहज पोहोचतात.

मुळा अवकाशात लागवडीसाठी निवडण्यात आला कारण तो सत्तावीस दिवसांत पूर्णपणे तयार होईल असा शास्त्रज्ञांना विश्वास होता. शिवाय, पालेभाज्यांमध्ये मुळा हे वेगळ्या प्रकारचे पीक आहे. मात्र, 2014 ते 2016 या काळात शास्त्रज्ञांनी अवकाशातही कोबीची लागवड केली आहे. तेथे कोबीचे पीक पस्तीस ते छप्पन दिवसांत तयार होते. अंतराळात वस्तू घेऊन जाणे ही एक मोठी समस्या आहे. म्हणूनच शास्त्रज्ञ कमीत कमी मातीत पिके कशी वाढवायची हे शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. अंतराळात शेती करण्याचा प्रयोग यशस्वी झाला आणि त्यातून गरजेनुसार खाद्यपदार्थ आणि फळे-भाज्यांची व्यवस्था केली गेली, तर अंतराळात स्थायिक होण्याचे स्वप्न साकार करण्यातील मोठा अडथळा दूर होईल. जपानी अंतराळवीर आणि वैज्ञानिक असलेल्या




चियाकी मुकाई याने आपल्या आयुष्यातील 500 तास अंतराळात घालवले आहेत, त्यांचा दावा आहे की 2030 पर्यंत चंद्रावर वसाहत करण्याचे काम सुरू होऊ शकते.मुकाई, त्यांच्या तीस सदस्यीय संशोधन पथकासह, जपानमधील टोकियो युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स प्रयोगशाळेत स्पेस कॉलनी प्रकल्पावर कठोर परिश्रम घेत आहेत. त्यांची टीम भविष्यात चंद्र आणि मंगळावर मानवांना कसे जिवंत ठेवता येईल याचा अभ्यास करत आहे. चंद्रावर वसाहत प्रस्थापित करण्याच्या संदर्भात, मुकाईच्या टीमने अंतराळात अन्न तयार करण्याचा मार्ग शोधला आहे. या प्रयत्नात, खारट द्रवाला उच्च व्होल्टेज वीज पुरवून द्रव प्लाझ्मा तयार केला जाईल. त्याचा वापर अन्न उत्पादनात केला जाईल. या नवीन तंत्रज्ञानाने बटाट्याचे उत्पादनही लवकरच करता येणार आहे. हा प्रयोग यशस्वी झाला तर तो एका मोठ्या चमत्कारापेक्षा कमी नसेल.

हवामान बदल आणि इतर कारणांमुळे जगभरातील शेतीवर दबाव वाढत आहे. साहजिकच वाढत्या लोकसंख्येसाठी भविष्यात अन्नाचे संकट निर्माण होणे साहजिकच आहे. याची स्पष्ट चिन्हे दिसू लागली आहेत. अशा परिस्थितीत हे आव्हान पाहता अवकाशातील पिकांचे महत्त्व आणखी वाढते. अंतराळात शेतीच्या यशस्वी प्रयोगामुळे अन्न संकटासारख्या आव्हानातून सुटका होऊ शकते, असे संशोधकांचे मत आहे. चीन 1987 पासून अशा प्रयोगांमध्ये सहभागी आहे. स्पेस म्युटाजेनेसिस तंत्रज्ञानाचा सतत वापर करणारा हा जगातील एकमेव देश आहे.पिकांची बियाणे अंतराळात नेण्यासाठी चीनने डझनभर मोहिमा सुरू केल्या आहेत. चिनी शास्त्रज्ञांनी 1990 च्या दशकात प्रथम अंतराळ-जातीचे पीक - युजीओ 1 नावाच्या गोड मिरचीचा एक प्रकार घेतला होता. अलिकडच्या दशकात चीन जागतिक अंतराळ शक्ती म्हणून उदयास आला आहे. 2006 मध्ये, त्याने शिजियान-8 उपग्रहाद्वारे अंतराळात दोनशे पन्नास किलोपेक्षा जास्त बियाणे आणि सूक्ष्मजीवांच्या एकशे बावन्न प्रजातींची आतापर्यंतची सर्वात मोठी खेप पाठवली होती.याशिवाय गेल्या काही वर्षांत गवत, बार्ली, अल्फाल्फा आणि अनेक प्रकारच्या बुरशीसह बारा हजार बिया देखील अंतराळात पाठवण्यात आल्या होत्या, ज्या चीनमधील तिआन्हे स्पेस स्टेशनवर सहा महिने घालवल्यानंतर परत आणल्या गेल्या होत्या. अंतराळात पाठवलेल्या बिया सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात राहतात जिथे त्यांना मोठ्या प्रमाणावर अवकाशाच्या किरणोत्सर्गाचा सामना करावा लागतो. हे वनस्पतींच्या वाढीच्या प्रक्रियेला गती देते ज्याला आपण स्पेस म्युटाजेनेसिस म्हणतो. हा प्रयोग काही वनस्पतींसाठी योग्य ठरला नाही, तर काहींसाठी तो अत्यंत फायदेशीर ठरला. याचे कारण असे की काही बिया विपरीत परिस्थितीतही संकटांना तोंड देण्यास सक्षम होतात.

अशी रोपे जास्त फळे देतात आणि वेगाने वाढतात. त्यांना पाणीही कमी लागते. जेव्हा ते पृथ्वीवर परत आणले जातात, तेव्हा या अंतराळ-जातीच्या वनस्पतींच्या बियांची काळजीपूर्वक चाचणी केली जाते आणि नंतर पिकांच्या नवीन जातींवर काम सुरू होते. लुयुआन-502 या गव्हाच्या जातीचे यश हेच स्पष्ट करते. त्याची उत्पादकता खूप जास्त आहे आणि वेगवेगळ्या प्रदेशात आणि वेगवेगळ्या परिस्थितीत त्याची लागवड करता अंतरराष्ट्रीय परमाणु ऊर्जा एजंसीच्या मते, लुयुयान-502 चे उत्पादन चीनमध्ये उगवल्या जाणाऱ्या मानक गव्हाच्या वाणांपेक्षा अकरा टक्के जास्त आहे.

गव्हाच्या इतर जातींपेक्षा यात जास्त दुष्काळ सहनशीलता आणि सामान्य कीटकांचा प्रतिकार असतो. अशा परिस्थितीत, असे शेतीचे प्रयोग अंतराळवीरांसाठी मैलाचा दगड ठरू शकतात आणि अंतराळातील अन्न संकटाच्या समस्येवर उपाय देखील देऊ शकतात.

# अजरामर कवयित्री बहिणाबाई चौधरी



आधुनिक केसरी

**बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्वातील त्यांचे स्थान ध्रुव तात्यासारखे अढळ आहे म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्य प्रतिभिने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवीयत्रीची आज जयंती त्यानिमित्त बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन!**

मराठी साहित्यातील अजरामर कवियत्री बहिणाबाई चौधरी यांची आज जयंती. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले. बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता वाचता येत नव्हत्या त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरीक्षर होत्या मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरले. बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उत्स्फूर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. याकामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत. बहिणाबाई काम करताना जेंव्हा कविता म्हणत तेंव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हे ही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव व मावसभाऊ पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली कविता, गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि उदगारले अहो हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे! आचार्य अत्रेंने त्या सर्व कविता आपल्याकडे घेतले आणि ते प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. १९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्य संग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवीयत्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी - अहिराणी - खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर - माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण - उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्य प्रतिभेची वैशिष्ट्ये होती. शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके तेंव्हा ( मियते ) मिळते भाकर......, खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला......, मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर...... धरित्रीले दंडवत..... यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे, संपर्क क्र. ९९२२५४६२९५

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मनातील जखमांवर ज्ञान हाच एकमेव प्रभावी उपाय



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपल्या मानत ज्या सतत सल करणाऱ्या जखमा आहेत. याचे निर्मार्ते सुद्धा आपण स्वतः आहोत. यासाठी इतर कोणीही कारणीभूत नाही. यासाठी आपण इतरांना जबाबदार समजतो. ते आपलं सुद्ध अज्ञान आहे. मुळात आपण काहीतरी विपरीत किंवा निसर्गाला मान्य नसेल अशा काहीतरी आपल्या विचित्र मागण्या मनात निर्माण करून वावरत असतो. मग त्या मागण्या जीवन जगत असताना वेळेवर किंवा योग्य वेळी पुर्ण होत नाहीत. किंवा काही विषयात अपेक्षाभंग झालेला असतो.**

सृष्टीच्या अलिखित नियमानुसार जन्म आणि मृत्यू निश्चित आहे. यामध्ये कोणतीही शक्ती जसं सत्ता, संपत्ती, ऐश्वर्य, विज्ञान युगातील प्रगती यापैकी कोणीतीही बाब बदल करू शकत नाही. तसंच आपल्याला मिळालेलं हे मानवी शरीर नश्वर आहे. मग हे सगळं एवढं किलियर आहे. तस पाहिलं तर जीवन कालावधी पण निश्चित नाही. मग क्षणभंगुर असणार हे जीवन....! तरीसुद्धा आपण मनात दुःखाचे पर्वत कशासाठी निर्माण करतोय....? तसं पाहिलं तर जीवन म्हणजे जखमांचा बहुपाश. वेगवेगळ्या वयातील वेगवेगळ्या जखमा पण त्या मनाला झालेल्या मग त्याची सल तर जाणवणारच. कारण जखामांचे निर्मातेही आपण स्वतःच आहोत. परंतु आपण स्वतः हे कधीच मान्य करत नाही. हेच आश्चर्य आहे..!

आपल्या मानत ज्या सतत सल करणाऱ्या जखमा आहेत. याचे निर्मार्ते सुद्धा आपण स्वतः आहोत. यासाठी इतर कोणीही कारणीभूत नाही. यासाठी आपण इतरांना जबाबदार समजतो. ते आपलं सुद्ध अज्ञान आहे. मुळात आपण काहीतरी विपरीत किंवा निसर्गाला मान्य नसेल अशा काहीतरी आपल्या विचित्र मागण्या मनात निर्माण करून वावरत असतो. मग त्या मागण्या जीवन जगत असताना वेळेवर किंवा योग्य वेळी पुर्ण होत नाहीत. किंवा काही विषयात अपेक्षाभंग झालेला असतो. ज्याच्यावर विश्वास ठेवला त्यानं दगाफटका केलेला असतो. महत्वकांक्षा पुर्ण झालेली नसते. जे-जे आपले हेतु असतात. ते सुद्धा साध्य झाले नाही तर म्हणजे एकंदरीत दैनंदिन जीवनातील प्रत्येक विषयाच्या अनुषंगाने अपयश पराभवाला सामोरे जावे लागले, तर आपण खिन्न होऊन जखम निर्माण करतो. असे अनेक कारणं जखमा होण्यासाठी कारणीभूत आहेत. ज्यामुळे मनात जखमा निर्माण होतात. परंतु खरा ज्ञान पुर्वक विचार केला तर या क्षुल्लक कारणावरून मनात जखम निर्माण करून घेणे म्हणजेच आपण किती अज्ञानी आहोत....? बहुतांश म्हणजे अगदी अपवादात्मक काही लोक सोडले तर प्रत्येकाच्या मनात कोणती ना कोणती सल जखम असतेच. जखम ही लहान मोठी असु शकते. त्यामध्ये सुद्धा कोणाची जखम जुनी झालेली असते. तर कोणाची ताजी जखम असते. मग हिच जखम वारंवार सलते आणि उद्विग्नता येते. जखम होऊ देणं हेच मुळात अज्ञान आहे. आणि कळत न कळत जखम झाली तर ती तात्काळ कशी दुरूस्त होईल हे ज्ञान अवगत असल पाहिजे. मनातील जखमा ह्या वैद्यकीय उपचार घेऊन बऱ्या होत नाहीत. तर त्यासाठी स्टीक उपचार काय हे सुद्धा समजणं गरजेचे आहे. अनेक जखमा ह्या सार्वजनिक करुन तीव्रता कमी करता येते. परंतु काही जखमा ह्या सार्वजनिक करता येत नाहीत. आणि त्याची सलही कमी होत नाही. मग अशा वेळी जखम मनात कधी पर्यंत साठवणार...? आणि कशासाठी साठवणार...? मुळात निस्वार्थी निःसंकोचपणे साधं सरळ सोप्या पद्धतीने अंहकार मुक्त, आणि ज्ञान युक्त, निर्मोही जीवन जगता आल तर मनात जखम निर्माण होणार नाही. आणि या अगोदर निर्माण झालेल्या जखमांवर ज्ञान हाच एकमेव उपाय आहे. आता नेमकं कोणतं ज्ञान गृहित धरावं तर ज्या पद्धतीची जखम मनात झाली आहे. त्याच पद्धतीच ज्ञान त्या जखमेला बरं किंवा कायमचं दुरूस्त करू शकत. आणि म्हणून आपण ते ज्ञान मिळवण्या ऐवजी जखमेलाच कुरवाळत बसतो. आणि मग त्याच्या वेदना वाढवतो. मुळात असं करणं चुकीचं आहे. आणि म्हणून अस न करता त्या-त्या जखमांवर उपयुक्त अस योग्य ज्ञान वारंवार संगृही ठेवून आपण या जखमा कायमच्या बऱ्या करू शकतो. आणि ज्या पद्धतीची मनातील जखम आहे. त्या पद्धतीचे ज्ञान अवगत करून आपण या जखमांच्या ओझ्याखालून मुक्त होऊ शकतो. आणि अशा पद्धतीने मनाला जखमच होणार नाही यासाठी सुद्धा त्या-त्या पद्धतीचे ज्ञान आपण अवगत केले पाहिजे. जेणेकरून मनाला जखमच होणार नाही......!!.

# भारतीय अमेरिकन पिढी



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**एक मात्र खरे. ही तरुण पिढी आपल्या पालकापासून हजारो मैल दूर राहत असली, त्यांचे नागरिकत्व अमेरिकन असले तरी ती भारतीय आहेत. नोकरीसाठी ज्या तडजोडी करावया लागतात त्यातलीच ही तडजोड. ही तडजोड फक्त या मुलांनीच केलेली नाही. आता एकाकी झालेल्या त्याच्या पालकाचीदेखील संमती होतीच, ती घरटी सोडून दूर देशी उडून गेली तेव्हा. मग तक्रार कुणी कशासाठी करायची?**

मी बऱ्याच देशात भ्रमण केले असले तरी अमेरिकेचा योग फारसा आला नाही. अपवाद फक्त हार्वर्ड विद्यापीठात एक कार्यशाळा अटेंड करण्याचा! हे आधीच स्पष्ट केलेले बरे. त्यामुळे अमेरिकेविषयी न लिहिता तिथे राहणारी जी भारतीय मंडळी आहेत, त्याच्या भारतात राहणाऱ्या वृद्ध, एकाकी पालकाविषयी लिहावेसे वाटले. कारण तशा अनेकांशी माझे मैत्रीचे, जिव्हाळ्याचे संबंध आहेत. मी हैद्राबादला राहत असल्याने येथील अनेक कुटुंबाशी संबंध आहेत. त्याच्या कथा व्यथाची ओळख आहे.येथे मध्यम, उच्च वर्गात असे घर क्वचितच सापडेल, जेथील मुलगा, मुलगी, सून, जावई अमेरिकेत नाही! आता अमेरिकेबरोबर युरोप, कॅनडा, आस्ट्रेलिया, सिंगापूर या देशांची भर पडलीय. अर्थात सर्वात जास्त तरुणाची निर्यात अमेरिकेतच. ही परिस्थिती हैद्राबादपुरती मर्यादित नाही. बंगलोर, मुंबई, पुणे, एव्हढेच काय तर नागपूरसारख्या शहरात हीच परिस्थिती कमी-अधिक प्रमाणात आहे.

या प्रश्नाचे गांभीर्य गेल्या दोन तीन वर्षात अधिक तीव्र झाले आहे.२०१९ च्या मार्चमध्ये लॉकडाऊन सुरू झाला. तेव्हापासून तर २०२१ शेवटापर्यंत परिस्थिती गंभीर होती. ज्यांची मुले अमेरिकेत आहेत ते पालक साधारण दोन-तीन वर्षाआड तिकडे जात असत. पूर्वी देश बघायला. ते कौतुक झाल्यावर बाळंतपण करायला... मग बेबी सिटिंग... सुरवातीची नवलाई एक-दोन ट्रीपमध्ये कमी होणार. मग शेवटी कोरडा उपचार... कर्तव्य भाव! काही आई वडील मुला-मुलीचे लग्न झाल्यावर पटत नाही म्हणून समझोता करायला, समजवायलादेखील जातात! तर काही आगीत तेल ओतायलादेखील जातात. कारण प्रत्येक आई-वडीलांना आपली बबडी किंवा आपला बंड्या तेव्हढा खरा असेच वाटते.हे अमेरिकावारीचे कौतुक पाच दहा वर्षात कमी होते. जी मंडळी सत्तरी पार केलेली, त्यांना तर प्रकृतीच्या तक्रारीमुळे ते अशक्यदेखील होते. कारण तिकडची हेल्थ केअर सिस्टीम अतिशय महागडी. आपल्याकडे झटकन डॉक्टर उपलब्ध. त्यातले आपल्या ओळखीचे, आपल्या प्रकृतीची जाण असणारे. तिकडे अमेरिकेत केवळ महाग ट्रिटमेंट हीच समस्या नसते. प्रत्येक जण आपापल्या कामात व्यस्त. दोन-तीन दिवसांचा प्रश्न असला तर गोष्ट वेगळी. पण प्रकृतीचे प्रकरण गंभीर असले, लांबले तर ते सर्वांच्या गैरसोयीचे. अशा वेळी नाते कितीही जवळचे असले तरी दोन्ही पक्षी गैरसोय होतेच. कुचंबणा होतेच. कुणी मानो या न मानो, कटू सत्य नाकारता येत नाही.

कोरोना काळात तर इकडच्या वृद्ध पालकाची बरीच पंचाईत झाली. त्यापैकी ऐकलेल्या काही कहाण्या हृदयद्रावक आहेत. काळीज पिळवटून टाकणारा अनुभव आहे काही घरातला. तसे बहुतेक कुटुंब सधन असतात. पालकांना पेन्शन.ते तसे मुलावर, मुलींवर,अवलंबून नाहीत. मुलेही गरज भासल्यास पैसे पाठवायला तयार. पण अनेक गोष्टी पैशाने विकत घेता येत नाहीत. बँकेतला पैसादेखील काही उपयोगाचा नाही हे आपण गेल्या दोन वर्षांत चांगले अनुभवले. वृद्ध व्यक्तींना नोकर, स्वयंपाकाची बाई अशा मदतीची गरज असते. लॉकडाऊनमध्ये या सोयी नियमित उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे या अमेरिकन भारतीय मुलांच्या येथील पालकाची खूपच गैरसोय झाली. काहींना हृदयविकाराचा त्रास, कुणाला करोणा झालेला, श्वासाचा त्रास, कुणाला दमा, कुणाला फ्रॅक्चर.. अशा इमर्जन्सी ला कोण धावून येणार? शेजारी-पाजारी एरवी असतात मदतीला. पण या महामारीने कधी नव्हे ते मृत्यूचे भय वाढलेले! ज्याला त्याला आपल्या जीवाची काळजी. नातेवाईक देखील जवळ नाहीत. असेल तरी उपयोग नाही. कारण प्रत्येक जण एकाच समस्येत अडकलेला. घरोघरी मातीच्या चुली म्हणतात तसा प्रकार! अशा एकटे राहणाऱ्या दोघांपैकी एक सिरियस झाला किंवा एकाचा मृत्यू झाला तर काय परिस्थिती उद्‌भवली असेल याची कल्पनाच केलेली बरी. अशा घटना घडल्या आहेत. हा मृत्यू करोणाने झाला असेल तर मग विचारायलाच नको. कडक सरकारी नियम, जाच, पिळवणूक अशा विपदाचा सामना अनेकांना करावा लागला या काळात. परिस्थितीच अशी होती की प्रत्येकाचाच नाईलाज होता. इच्छा असूनही पर देशातली मुले येऊ शकत नव्हती. दूरची कशाला, जवळचे परगावी असलेले नातेवाईकदेखील मदतीला जवळ नव्हते. दोष कुणालाच देता येत नाही. प्रत्येक जण हतबल होता.

तसे आधुनिक तंत्रज्ञानामुळे संपर्क होता. व्हिडिओ कॉलवर बोलता येते. बघतादेखील येते. पण इथेही संवादाला मर्यादा असतात. तुमचा मुलगा, मुलगी बोलतात. पण त्यानंतरच्या पिढीशी संवादाला मर्यादा येतात. मुले, नाती लहान असतात तोपर्यंत ठीक. थोडेफार बोलतात. आपल्यालादेखील कौतुक वाटते. पण ही पिढी मोठी झाली की त्यांचे उच्चार कळेनासे होतात. त्यांचे विषय, त्याच्या आवडी निवडी बदलतात. मग संवादाला मर्यादा पडतात. सगळे कोरडे हाय हॅलो पुरते उरते! वेळेचे बंधन असते. ते आपापल्या कामात व्यस्त होत जातात. इकडची वृद्ध पालक मंडळी त्याच त्या जुन्या भावनिक वातावरणात रमलेली असतात.त्या जुन्या कोषातून बाहेर यायला तयार नसतात. नव्या पिढीचे विषय वेगळे. प्रायोरिटीज वेगळ्या. मेळ जमत नाही. अनेक गोष्टी यांना पटत नाहीत. पण बोललेले खपत नाही. क्वचित गैरसमज होतात. ते निस्तरताना दोन्ही पक्षी चक्क तारांबळ उडते.दोष कुणाचाच नसतो. दोन्ही पक्ष आपापल्या ठिकाणी बरोबरच असतात. इथे दिवस मोजणाऱ्या वृद्ध पालकाची भावनिक कुचंबणा होते. हे दुःख असे जे सांगताही येत नाही अन् सहन ही होत नाही.

माझे अनेक वर्षे बरोबर काम केलेले एक तेलुगू प्राध्यापक सध्या फार हलाखीच्या अवस्थेत आहेत. त्यांची दोन्ही मुले अमेरिकेत. कोविडमुळे तिकडे त्याच्या जावयाचे निधन झाले. त्याचा मनावर आघात झाला. सगळे तिकडेच आटोपावे लागले. इथे दोघे पती पत्नी एकटेच. गृहस्थ अतिशय हुशार... उत्तम करियर. मध्यंतरी ते बाथरूममध्ये तोल जाऊन पडले. डोक्याला दुखापत झाली. स्मृती गमावून बसले! मुलगा येऊन गेला. पण तो तरी किती दिवस राहणार? वर्क फ्रॉम होम किती दिवस करणार? त्याला परतावे लागले. आईची तब्येत ही बरी नसते. ते दोघेही नोकरांच्या भरवशावर आहेत एकटे. मित्र, नातेवाईक अशा अवस्थेत किती मदत करणार? लोकांना बोलायला सोपे असते. मुलेच जवळ नाहीत, तर बाकीचे काय करणार? पैशाची कमी नाही. हवी ती मेडिकल ट्रीटमेंट घेण्याची, लाखो खर्च करण्याची ऐपत आहे. पण काय उपयोग या पैशांचा? पैसे काय चाटायचे आहेत? अशा वेळी जवळचे,जिव्हाळ्याचे माणूसच हवे असते.त्याला पर्याय नाही. अन् ते शक्य नाही.

काही पालकांना वाटते, मुलाने आता परतावे. खूप झाले कमावणे.. तिकडे राहणे. शेवटी आई-वडीलासंबंधी मुलाचे काही कर्तव्य आहे की नाही? मग मुलाचे इमोशनल ब्लॅकमेलिंग सुरू होते. पण मुलाची भावनिक कुचंबणा होत असली तरी त्याची बायको परतायला तयार नसते. तिकडच्या लाईफची सवय झालेली असते. ते काहीसे हाय फाय जगणे इकडे आल्यावर शक्य नसते. जॉबमध्ये स्ट्रेस असला तरी डॉलरच्या एक्सचेंज रेटमुळे होणाऱ्या लाखोंचा उत्पन्नाचे आकर्षण असते. तेव्हढा पगार इकडे मिळणार नाही, किंबहुना आता तर नवा जॉब मिळणेदेखील कठीण ही भीती असते. त्यातही जर मुले मोठी, शाळेत जाणारी असली तर त्याच्या शिक्षणाचा, पुनर्वसनाचा प्रश्न! आता तर ही मोठी झालेली मुले,इथे इंडियात यायला तयार नसतात. इथला गोंगाट, इथली अस्वच्छता, इथले मोठमोठ्याने बोलणे, हे काहीच त्यांना आवडत नाही. त्यांचा जन्मच तिकडे झालेला! अर्थात ही विधाने सरसकट सर्वांना लागू होणारी नाहीत. त्याला अपवाद निश्चितच आहेत. संस्कृती जपणारी कुटुंबे आहेत. काळजी घेणारी मुले आहेत. आजी-आजोबांशी प्रेमाने संवाद तोही मराठीत, करणारी नातवंडे आहेत. पण ती मायनॉरिटीत!

अमेरिकेत असणाऱ्या मुलांचे देखील काही प्रश्न असणारच.तिकडे विद्यापीठात प्रवेश मिळवणे, तिथल्या कठीण अभ्यासक्रमाशी, परिस्थितीशी जुळवून घेणे, त्या संस्कृतीशी झगडत सामोरे जाणे हे सगळे सोपे नसते. नोकरी मिळवणे, ती टिकवणे हेदेखील एक आव्हानच. आकर्षण असते ते केवळ डॉलरमध्ये मिळणाऱ्या पगाराचे. अन् विनिमय दरातून दिसणाऱ्या लाखातील रुपयाच्या पगाराचे! पण तिकडचे खर्च वेगळे. महागाईचे परिमाण वेगळे. स्वतःचे स्वतंत्र घर व्हायला वर्षानुवर्षे लागतात. खूप कष्ट लागतात. हे आपण विसरतो. त्यांनाही वाटते आई-वडील जवळ हवेत. नातेवाईक हवेत. पण एकाच वेळी सारे काही मिळत नाही. एका गोष्टीसाठी दुसऱ्या गोष्टीचा त्याग करावा लागतो. कशाच्या मागे लागायचं, काय धरायचं अन् काय सोडायचं हा ज्याचा त्याचा प्रश्न!



आमच्याच अपार्टमेंटमध्ये एक वृद्ध कुटुंब आहेत. गृहस्थ मोठ्या सरकारी पदावरून निवृत्त. पत्नी शाळेत शिक्षिका होती. त्यांची दोन्ही मुले अमेरिकेत. इकडे दोघांनाही कोविड होऊन गेला. पैकी पत्नी अधिकच गंभीर. व्हेंटिलेटरवर वगैरे. त्याच्या ओळखी-पाळखी खूप. त्यामुळे तशी अडचण भासली नाही. पैशाची तर नाहीच नाही. पण त्यांना भयंकर नैराश्याने ग्रासले. एकदा ते गप्पा मारताना म्हणाले, आता जगण्यात राम नाही. खूप जगून, भोगून झाले. अशा वेळी आम्हा दोघांनाही इच्छा मरण घ्यावे असे वाटते. त्यात गैर काय आहे? सगळे मना सारखे झाले आहे. मुले, नातवंडे आपापल्या ठिकाणी खुश आहेत. मग भुईला भार होऊन कशाला जगायचे? मी ऐकून सुन्न झालो. माझ्या डोळ्यांतले पाणी पाहून ते म्हणाले, यात वाईट काय, चुकीचे काय ते सांगा प्रोफेसर? मी निरुत्तर झालो...


या बाबतीत आमच्या परिचयातल्या जिंदादिल मिस्टर देसाईचा किस्सा अजब आहे. मिस्टर मिसेस देसाई दोघेही ऐंशी पार केलेले! देसाईना पेसमेकर लावलाय. मिसेस ना शुगर, बीपी, सांधेदुखी असे त्रास. त्यांची दोन्ही मुले अमेरिकेत. वर्षानुवर्षे.. हे सगळे जग फिरून आले, देशही भटकून झाला. पेन्शन भरपूर, त्यामुळे मुलावर अवलंबून नाहीत. त्यांची जवळच्या गावी शेती होती. घर होते. त्यांनी ते विकून टाकले. गावातली दोन गरीब मुले शहरात आणली. त्यांना थोडेफार शिकवले. ट्रेनिंग दिले. नोकऱ्या लावून दिल्या. देसाईचे घर मोठे. दुमजली. बंगलाच.. तिथेच त्यांची राहण्याची सोय. ही मुले देसाई पती-पत्नीची काळजी घेतात. सर्व कामे करतात. आता तर त्यांची लग्ने झालीत, त्यांना मुले झाली. देसाईंनी त्याच्या कुटुंबाचीदेखील सोय केली. त्या सुना घरातील कामे करतात. अमेरिकेतून मुले आलीत की या मुलासाठी वस्तू आणतात. जाताना भरघोस बक्षिसी देतात. आता तर नातवंडेदेखील खेळताहेत बंगल्यात देसायाच्या! ही खेड्यातून आलेली मंडळी दोघांची ही काळजी घेतात. देसायांना कसलीही चिंता नाही. त्याच्या अमेरिकेतील मुलांनाही नाही. गावातून आलेली मुले, त्याच्या बायका शहरी वातावरण अनुभवताहेत.एकूण देसायाकडे आनंदी आनंद आहे. पण असे नशीब फार कमी जणाच्या वाट्याला येते.

इथे एक गोष्ट नमूद करणे गरजेचे आहे. ही समस्या केवळ अमेरिकेत गेलेली मुले अन् त्यांचे इकडे एकाकी असलेले पालक इथपर्यंतच मर्यादित नाही. नुकतीच वृत्तपत्रात एक धक्कादायक बातमी वाचली. उत्तराखंड येथील एका दांपत्याने आपल्याच मुला अन् सुने विरोधात कोर्टात दावा दाखल केलाय. त्यांना नातवंडं हवे आहे. एका वर्षाच्या आत नातू जन्माला घाला नाहीतर पाच कोटी रुपये द्या असा हा विचित्र दावा! आम्ही मुलाला शिक्षण दिले, अमेरिकेत पाठवले. त्याचे २०१६ साली लग्न लावून दिले.त्यासाठी आम्ही सर्व कमावलेले गमावले मुलासाठी. पण आम्हाला नातू देखील देऊ शकले नाहीत हे! त्याच्या प्रायोरिटीज वेगळ्या आहेत. त्यांना आमची पर्वा नाही अशी त्यांची तक्रार. हे सामाजिक विधान एक विदारक सत्य आपल्या पुढे उभे करते. समाज कुठल्या दिशेने चाललाय ते दाखवते. एकूणच एकाकी वृद्ध व्यक्तीचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. अनेकांची मुले अमेरिकेत नसतील गेली. पण भारतात असली तरी ती जवळ नाहीत. अनेक कारणामुळे एकत्र कुटुंब पद्धत लयाला गेली. एकाच शहरात आई- वडील वेगळे राहतात. अशी उदाहरणे देखील आहेत. अजूनही आपल्याकडे वृद्ध व्यक्ती एकट्या सुखाने, आनंदाने, स्वतंत्र जगू शकतील अशा सोयी सुविधा नाहीत. त्या परदेशात आहेत. युरोपमध्ये तर वृद्ध मंडळी आरामात स्वतंत्र आयुष्य आनंदात जगतात. एंजॉय करतात. प्रवास करतात..आपल्याकडे सरकारी सुविधादेखील म्हणाव्या तितक्या सोयीच्या नाहीत. लाल फितीचा कारभार आहे. मानवतेचा ओलावा नाही. अधून-मधून काही चांगल्या कहाण्या माध्यमातून येतात. पण ते झाले अपवाद. बाकी एकूण परिस्थिती गंभीर म्हणावी अशीच!!

तसे इकडे अशा एकट्या राहणाऱ्या पालकाचे ग्रुप तयार झाले आहेत. सोशलमीडिया अन् इतर मनोरंजनाची साधने आहेत. कोविडची समस्या तशी जगभर होती. सारेच त्या विपदेतून होरपळत गेले. कमी-अधिक प्रमाणात सर्वांनाच चटके बसले. त्यातून खूप शिकायलादेखील मिळाले. ही इष्टापत्तीच म्हणायला हवी. यापुढे यातून आपण काय शिकतो, किती शहाणे होतो हे बघायचे!

आता केवळ सिनियर सिटिझन्ससाठी सर्व आवश्यक सोयी असणारी छोटी अपार्टमेंट्स बांधली जात आहेत काही शहरांत. तिथे मेडिकल,मनोरंजन,खेळ,खाणे पिणे अशा सर्व सोयी असतात. हे महागडे असले तरी सोयीच्या दृष्टीने उत्तम. याला वृद्धाश्रम नाही म्हणता येणार. आपले आई वडील किंवा एकटी आई, एकटे वडील वृध्द आश्रमात राहतात हे सांगताना मुलांना अडचणीचे होते. त्यापेक्षा हे सर्व सोयींनी परिपूर्ण अपार्टमेंट चांगले. मुले आली तर त्यांच्या राहण्यासाठी इथे गेस्ट रूम्स देखील असतात. अशा सोयी खरे तर सरकारने कमी खर्चात उपलब्ध करून द्यायला हव्या. कारण अनेकांना हा अवाढव्य खर्च परवडणारा नसतो. अशा वसाहती सहकारी तत्त्वावर देखील निर्माण करता येतील. कारण ही गरज उतारवयातील काही वर्षापुरतीच मर्यादित असते. ती आपली गरज संपल्यावर हस्तांतरित करण्याचीदेखील सोय हवी. तसे नियम करता येतील.सगळे काही शक्य आहे. सरकारी इच्छाशक्ती हवी. पण सरकारचा अजेंडा वेगळा असतो. खाजगी संस्था पुढे आल्या तरी प्रश्न सुटतील.

# दिवसाढवळ्या पडलेले स्वप्न दीर्घायुष्य देईलच ना



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**कोणालाही दीर्घायुष्यच चिंतत जावे. उगाच कुणाचे वाईट चिंतु नये. ते आपले काम नाही. स्वप्नात कोणी गेल्याचे दिसले तर त्याचे आयुष्य वाढते म्हणतात, तसे दिवसाढवळ्या मला पडलेले हे वैचारिक गोंधळाचे स्वप्नाने आपले साहेब, देवेगौडा, कुमारस्वामी, दिग्विजयसिंह आणि कमलनाथ यांना दीर्घायुष्य लाभो अशी प्रार्थना मी मनोमन करत असतानाच ती बस शिवाजीनगर एसटी स्टॅण्ड मध्ये वळली आणि मी पुढे प्रवास चालू केला हे सर्व विचार त्यागून.**

आज आत्ता मी काही कामानिमित्त पिंपरी चिंचवड मधून पुणे शहरात जात होतो. सकाळचे साडेदहा वाजले होते. माझे कारसमोर एक बस होती. संथपणे जात होती. त्या बसवर मागील बाजूस, म्हणजे माझे समोर मोठ्या अक्षरात साहेब लिहीलेले होते आणि त्याखाली थोड्या लहान अक्षरात पुष्पक लिहीले होते. ते वाचून माझी वैचारिक तंद्रीच लागली. मागच्या गाड्यांनी जोरजोरात हॉर्न वाजवल्यामुळे मी भानावर आलो. आणि त्या बसचे मागे मागे हळूहळू निघालो. पण का कोण जाणे मन अस्वस्थ झाले होते. या साहेब आणि पुष्पकचा काय संबंध असावा याचा मी विचार करायला लागलो.

थोडा विचार केल्यावर मन थोडे आनंदी होत होते. कारण मला वाटले नियतीने साहेबांसाठी पुष्पक विमान पाठवले आहे, दिल्लीला नेण्यासाठी. साहेब 2024 मध्ये बहूतेक भावीचे आजी पंतप्रधान होणार तर. खुप आनंद वाटला. आख्ख्या महाराष्ट्रातील जनतेचे स्वप्न पूर्ण होणार असे सारखे वाटायला लागले. मन डोलायला लागले. पण माणसाला दोन मनं देऊन देवाने गोंधळ करून ठेवलाय. एक मन चांगला विचार करत असताना नेमके अंतरमन वेगळाच विचार करते.

ते खाष्ट मन मला म्हणाले अरे विसरलास काय ? देवाने,






विठूमाऊलीने सर्व प्रथम पुष्पक पाठवले होते ते संतशिरोमणी, जगद्‌गुरु श्री तुकाराम महाराज देहूकर यांना वैकुंठात नेण्यासाठी. पुष्पक विमानाची तीच तर ओळख आहे. मी लगेच हे विचार झटकले. आणि मनाला बजावले भलतेसलते विचार मनात आणूही नको. आपले साहेब दीर्घायुषी आहेत. पन्नास वर्षे वयापेक्षा जास्त वय असणाऱ्या तमाम महाराष्ट्रीयन मराठी जनतेचे ऊर्वरित आयुष्य साहेबांना लाभो असे सर्वच मराठी जण सतत जप करत असतात. आणि त्यामुळे साहेब अतिदीर्घ आयुष्य जगणार आहेत.

मग मीच माझ्या गालावर चापटी मारून घेतली आणि असे अभद्र विचार मनाला शिवलेच कसे याचा विचार करून जळफळाट करत होतो. तेंव्हा परत माझे लक्ष त्या समोरच्या बसवर खिळले. आणि माझ्या लक्षात आले की गाडी नं. आहे एम पी 09 डीके 9956. मग मला हायसे वाटले आणि माझी मलाच लाज वाटली. मी मलाच म्हणालो मुर्खा ही गाडी तर मध्यप्रदेशची आहे. आपल्या साहेबांना तर साहेब म्हणून महाराष्ट्र राज्याबाहेर कोणीही ओळखत नाही. ते फक्त आपल्यासाठी जाणते राजे आहेत.

प्रकांड पंडित आहेत. सर्व राजकारणाचे डावपेच कोळून प्यालेले आहेत. आख्खा महाराष्ट्र त्यांच्याच तालावर नाचतो असे त्यांच्या कार्यकर्त्यांना वाटते. सतत ते साहेबांचा जयघोष करत असतात. मग मी परत बसचा नंबर काळजी पूर्वक पाहीला. आणि त्यातील डीके शब्दावर मी पुन्हा अडकलो. मनात आले डी म्हणजे देवेगौडा आणि के म्हणजे कुमारस्वामी यांचेसाठी हे पुष्पक आहे काय? परत म्हंटलं ते तर कर्नाटक मधले आहेत. त्यांचा मध्यप्रदेशशी काय संबंध. परत तो विचार झटकला. आणि डीकेचा अर्थ शोधायला लागलो. मग लक्षात आले मध्यप्रदेशशी संबंधीत डीकेचा शोध घ्यायला लागलो. आणि लक्षात आले की डी म्हणजे दिग्विजयसिंह आणि के म्हणजे कमलनाथ.

दोघेही 99 म्हणजे नव्वदीचे घरात पदार्पण केलेले 56 इंची सोबत पंगा घ्यायचा प्रयत्न करत राहतात म्हणून शिवराजसिंह चौहाण यांनी पुष्पक मागवले यांची रवानगी करायला. परत मनात आले कोणालाही दीर्घायुष्यच चिंतत जावे. उगाच कुणाचे वाईट चिंतु नये. ते आपले काम नाही. स्वप्नात कोणी गेल्याचे दिसले तर त्याचे आयुष्य वाढते म्हणतात, तसे दिवसाढवळ्या मला पडलेले हे वैचारिक गोंधळाचे स्वप्नाने आपले साहेब, देवेगौडा, कुमारस्वामी, दिग्विजयसिंह आणि कमलनाथ यांना दीर्घायुष्य लाभो अशी प्रार्थना मी मनोमन करत असतानाच ती बस शिवाजीनगर एसटी स्टॅण्ड मध्ये वळली आणि मी पुढे प्रवास चालू केला हे सर्व विचार त्यागून.

# आनंद-चैतन्याचा, गणेशोत्सव साजरा करताना...



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**गणपतीच्या आगमनाची आपण सर्वजण खूप आतुरतेने वाट पाहत असतो गणेशोत्सव म्हणजे आनंद आणि चैतन्याचा उत्सव असतो. गणपतीला विद्येची देवता, चौसष्ट कलांचा अधिपती आणि विघ्नहर्ता, संकट विमोचक म्हणतात. आपण कुठल्याही कार्याची सुरुवात करताना श्री गणपतीचे पूजन करतो आपले कार्य निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी प्रार्थना करतो. ।। वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ निर्वीघ्नम कुरुमे देव सर्वकार्येषु सर्वदा ।। गणपती बाप्पा आले... घरा घराचे मंदिर झाले.. बघा असे म्हणत आपण घरोघरी शोडपचारे पूजा करून गणपतीची स्थापना करीत असतो. एकवीस एकशे एक मोदकांचा नैवेद्य दाखवत असतो. काही ठिकाणी उकडीचे मोदक तर काही ठिकाणी पेढ्याचे मोदक करून नैवेद्य दाखवला जातो रोज सकाळ संध्याकाळ आरती होते सार्वजनिक ठिकाणी सुद्धा ठरवून दिलेले कुटुंब आरती करतात एक छान असे वातावरण तयार झालेले असते. प्रसंगी रोज वेगवेगळा प्रसादही खिरापती बरोबर वाटला जातो.**

महाराष्ट्रात गणेशोत्सवाला सुरुवात पेशव्यांचे काळात झाली. भाद्रपद शुद्ध चतुर्थी पासून दशमी पर्यंत सात दिवस हा उत्सव होत होता. गणेश उत्सवाला सामाजिक आणि सार्वजनिक स्वरूप 1893 सालापासून मिळाले त्यावेळी लोक जागृतीचे एक मुख्य साधन म्हणून प्रबोधनाचे स्वरूप दिले. लोकमान्य टिळकांनी समाजात एक्याची भावना वाढावी या हेतूने गणेशोत्सवाची त्यासाठी निवड केली आणि त्यावेळी हा उत्सव गणेश चतुर्थी पासून ते अनंत चतुर्दशी पर्यंत असा दहा दिवस सुरू करण्यात आला. त्यावेळच्या परिस्थितीत सर्व समाजाला एकत्र करावे आणि राष्ट्रीय अस्मिता जागृत करावी हा त्यामागचा मोठा उद्देश होता. अर्थातच स्वातंत्र्य आंदोलनात सार्वजनिक गणेशोत्सवात जे लोक जागृती कार्य केले ते उल्लेखनीय आहे.

सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात पुण्यात झाली आणि हळूहळू तो संपूर्ण महाराष्ट्रात साजरा होऊ लागला दिल्ली, कलकत्ता, गोवा, मद्रास या ठिकाणी काही प्रमाणात सुरू झाला पुणे, मुंबई, नागपूर, अशा अनेक ठिकाणी गणेशोत्सवासाठी मंडळाची स्थापना होऊ लागली. त्यात प्रामुख्याने धार्मिक, सामाजिक, देशप्रेम असे विषय व्याख्यानमालाद्वारे येऊ लागले. वृत्तपत्रातून प्रसिद्धीही मिळू लागली. गणेशोत्सव सुरु व्हायला आज जवळपास 129 वर्षे झाली आहेत.

आपण महाराष्ट्रीय माणसं तशी खूपच उत्सव प्रिय आहोत. सण उत्सव खूप आनंदात साजरे करतो. पण आता त्याचे स्वरूप बदललेले आहे. पूर्वीच्या काळी म्हणजे काही वर्षांपूर्वीच गणपतीची सजावट घरच्या घरी केली जात होती. आठ-दहा दिवसांपासून आधीच त्याची सुरुवात होत होती. आता मात्र सर्व सजावट डेकोरेशन सामान आयते मिळते किंवा त्याचा कॉन्टॅक्ट दिला जातो. त्यामुळे त्यावेळी जे समाधान होते ते आज नाही असे मात्र म्हणावं असे वाटते. ज्या उद्देशाने हा उत्सव सुरू करण्यात आला त्याचा विसर पडलेला आहे. गेल्या काही वर्षात उत्सव साजरे करण्यात राजकीय व्यक्तिंच्या प्रवेशामुळे, पाठबळामुळे उत्सवांना वेगळे स्वरूप प्राप्त होत आहे हे सत्य नाकारता येणार नाही. कारण राजकीय व्यक्तींकडून आपला राजकीय हेतू साध्य करण्यासाठी अशा मंडळांना मोठ्या मोठ्या देणग्या देऊन आकृष्ट केले जाते. परिणामी हा पैसा योग्य कामी खर्च न होता फक्त डी.जे, रोशणाई, मोठ मोठ्या मूर्ती आणि इतर अनेक कारणासाठी खर्च होतो, परंतु फार कमी मंडळाकडून विधायक कामे होतात गणेश मंडळात असणारी बहुसंख्य मंडळी ही तरुणच असते आणि अशावेळी त्या मंडळाकडून होणाऱ्या कार्यक्रमाला विधायक स्वरूप कसे प्राप्त होईल, सामाजिक ऐक्य कसे टिकून राहील, पर्यावरणाचा विचार कसा केला जाईल किंवा प्रदूषण निर्माण होणार नाही याची दखल घ्यायला हवी.

उत्सवात पूजेसाठी मातीची मूर्ती असावी असे उल्लेख आहेत. आणि संकल्पात सुद्धा

मृण्मय पार्थिव महागणपती पूजनं करिष्ये.

असे म्हणण्याचा प्रघात आहे. कारण कर्मकांडातील बहुतेक पूजा ह्या विशेष कालावधीनंतर विसर्जित केल्या जात असतात, म्हणूनच घरात आणली जाणारी गणपतीची मूर्ती ही आपल्याला स्वतःला आणता येईल एवढे असावी, अनेक लोक चांदीच्या मूर्तीची स्थापना करतात परंतु ते शास्त्र संमत नाही असेही म्हटले जाते. भक्ती भावाने केलेली उपासना देवाला मान्य असते असे आपण वाचतो, मानतो, परंतु याचा अर्थ नवनवीन पर्याय शोधून काढणे असा नाही. ज्या मूर्तीचे विसर्जन करता येईल तीच मूर्ती पूजेला घ्यावी हे महत्त्वाचे आहे आकर्षक मूर्ती असते म्हणून अलीकडे प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती फार मोठ्या प्रमाणावर घेतल्या जातात पर्यावरणाच्या दृष्टीने त्या योग्य नसतात मातीच्या मूर्ती या सुद्धा खूप महाग मिळतात त्यामुळे त्या घेण्याकडे कल नसतो. पर्यावरण प्रेमींकडून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना विरोध होऊन ते कोणी मान्य करत नाही. परिणामी उत्सवानंतर या मूर्तींची कशी अवस्था होते हे सुद्धा आपल्याला दूरचित्रवाणीवरून बघायला मिळते. त्यामुळे योग्य ती किंमतीत शाडूच्या मातीच्या मूर्ती बाजारात मिळायला हव्या त्या उपलब्ध करून देता येईल हे बघायला हवे. या विषयात समाज प्रबोधन कसे होईल या सगळ्या गोष्टी ओघाने येतात. अशा कार्यक्रमा मार्फतच अशा गोष्टी आपण अपेक्षित करू शकतो. केवळ खूप केलेली रोषणाई, मूर्तीची उंची, सजावटीतला भडकपणा, यावरून भक्तीभाव ठरत नाही. किंवा मंडळाची प्रतिष्ठाही ठरत नाही. तर खरे म्हणजे अशा उत्सवांमधून काहीतरी प्रबोधन होईल लोकशिक्षण जनजागृती होईल हाच विचार करायला हवा.जो लोकमान्य टिळकांचा होता. तो साध्य होईल अशा रीतीने प्रत्येक मंडळाने काही कार्यक्रम आयोजित करायला हवे.

गणेशोत्सव हा तर महाराष्ट्रातला सगळ्यांचा आवडता आणि मोठा उत्सव. ज्या त्या भागात प्रथेप्रमाणे तो साजरा केला जातो. कुठे दिड दिवस कुठे पाच ,सात, तर कुठे अनंत चतुर्दशीपर्यंत असतो. कोकणात दीडच दिवसाचा गणपती असतो, कोकणात हे सार्वजनिक आणि घरगुती गणपती आगमन हा एक जल्लोष असतो पण खूप उत्साह असतो. गावातील 30 40 कुटुंब एकत्र येऊन गणपतीला डोक्यावरून डोलत गजरात नाचत गात आणि गुलाल उधळत घेऊन येतात. कोकणातून विखुरलेले सर्व नोकरदार गणपतीला गावी येतात त्यासाठी एसटी महामंडळाकडून खूप मोठी व्यवस्था केली जाते. जास्तीच्या रेल्वे गाड्या सोडल्या जातात.

आपल्या महाराष्ट्रात मुंबई, पुणे ,नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर, जळगाव, अशा अनेक ठिकाणी गणेशोत्सव धुमधडाक्यात साजरा केला जातो. मुंबईचे लालबागचा राजा, सिद्धिविनायक, नागपूरला टेकडी गणपती, रामटेक चा गणपती. सांगलीचा पटवर्धन संस्थांनचा गणपती, टिटवाळ्याचा गणपती, प्रसिद्ध आहेत. कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी गणपती, गुरुजी तालिम गणपती, तुळशी बाग गणपती, केसरी वाडा गणपती, हे पुण्यातील मानाचे पाच गणपती तसेच नवसाला पावणारे दगडूशेठ हलवाई गणपती, सारस बागेतील गणपती आहेत. गणेशोत्सवाच्या काळात संपूर्ण महाराष्ट्रातून पुण्याचे गणपती पाहण्याला भाविक येत असतात. जळगाव जिल्ह्यात पद्मालय व तरसोद गणपती, विदर्भातील कळंबचा गणपती, मराठवाड्यातील जालना जिल्ह्यातील राजुरचा गणपती, हे सगळे प्रसिद्ध गणपती ठिकाण आहेत.

त्याशिवाय रांजणगाव-महागणपती,महडचा-वरदविनायक,



पालीचा-बल्लळेश्वर, ,लेण्याद्रीचा-गिरिजात्मक, थेऊरचा-चिंतामणी, मोरगांवचा-मोरेश्वर,ओझरचा-विघ्नेश्वर, सिद्धटेकचा-सिध्दिविनायक,,या ठिकाणी असलेले अष्टविनायक ठिकाण प्रसिद्ध आहेत.

गणेशोत्सवाच्या काळात या ठिकाणी भाविकांची प्रचंड गर्दी असते. या काळात दर्शन घेण्याचे महत्त्व तर आहेच पण भाविकांना खूप मोठे आत्मिक समाधान मिळते. अनेक लोक या काळात यात्रा कंपनी मार्फत तीन दिवसीय अष्टविनायक यात्रा करतात ती सुद्धा एक आनंददायी अशी गोष्ट आहे काही वर्षांपूर्वी आम्ही सुद्धा गणेशोत्सवात पुण्याला येऊन जंगली महाराज रोडला लॉज मध्ये मुक्काम करून गणपतीचे दर्शन घेतले आहे या निमित्ताने ती आठवण आली.

भारताप्रमाणे ज्या ठिकाणी परदेशात भारतीय लोक गेले आहेत त्या त्या ठिकाणी गणेशोत्सव साजरा केला जातो. नेपाळ हेरंब गणेश, ब्रह्मदेश, म्यानमार ,श्रीलंका, व्हिएतनाम, कंबोडिया, फियाडल्फिया न्यू जर्सी. बोस्टन, बेएरिया, अमेरिकेत, उत्सव साजरा केला जातो.

एकूणच विचार केला तर सध्याच्या परिस्थितीत ह्या उत्सवाचे स्वरूप खूप बदलले आहे.धार्मिकते पेक्षा ईतर गोष्टींना महत्व दिले जाते. मोठया मूर्ती, देखावे झगमगाट,रोषणाई, डी.जे.च्या तालावर कर्कष्य गाणी,हे प्रमाण वाढले आहे.लोकमान्य टिळकांनी ज्या विचारांनी घरातल्या गणपती बरोबरीने सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरूवात केली,त्याचा जवळपास विसर पडल्या सारखा आहे.अगदीच तुरळक मंडळात गणपती अथर्वशीर्षाचे पठण होते. पुण्यामध्ये हजारोंच्या संख्येने ऋषिपंचमीला दगडूशेठ गणपती समोर अथर्वशीर्ष पठण केले जाते. काही वर्षापूर्वी गणेश व्याख्यानमाला सारखे उपक्रम केले जात होते.निरनिराळ्या विषयावरचे विचार ऐकायला मिळायचे. देखावे,रोषणाई, तर करावीच पण ह्या गोष्टीलाही प्राधान्य होते आता काही ठराविक ठिकाणीच असे व्याख्यानमालाचे कार्यक्रम आयोजित केले जातात अथर्वशीर्ष पठण स्पर्धा घेतल्या जातात.

डी.जे.च्या कर्कष्य तालावर जी गाणी लावली जातात,तो प्रकार कुठेतरी थांबावा असे वाटते.उत्सव साजरा करण्यातूनच आनंद,समाधान, जरुर मिळायला हवे पण त्यापासून कोणाला त्रास होणार नाही हा विचारही असायला हवा. म्हणूनच हा उत्सव साजरा केला जातो उत्सवा मागचे खरे धार्मिक,सांस्कृतिक, प्रबोधन महत्वाचे विषयांचा, उद्देशाचाही विसर पडायला नको. उत्सव साजरा करताना जर आपण काही गोष्टी लक्षात ठेवल्या तर त्या उत्सवाचे हेतू आणि पावित्र कायम राहील गणेश मूर्ती निवडताना ती शाडूच्या मातीची किंवा इको फ्रेंडली असावी. प्लास्टर ऑफ पॅरिस किंवा थर्मोकोजी नसावी. मूर्तीची उंची प्रमाणात असावी. खूप मोठ्या मूर्ती असल्यास त्या विघटनाला वेळ लागतो आणि बऱ्याच वेळा मग विसर्जन करताना पवित्र्यता राहत नाही. उत्सवात योग्य वेळातच विजेचा वापर केल्यास आणि आकर्षक पण कमी वीज लागणारी रोषणाई केली तर विजेची बचतही होते आरास करतानाही ती पर्यावरण पूरक असल्यास फारच चांगले, तसेच रांगोळीचा वापर करतानाही ते आरोग्यासाठी हानिकारक ठरणार नाही असेच रंग वापरावे. सरकारने बंदी आणलेल्या प्लास्टिकचा वापर होणार नाही याची दक्षता घ्यावी. उत्सवाचे काळात आपल्या उत्साहामुळे म्हणजेच डी.जे लाउड स्पीकर याच्या वापरामुळे आजूबाजूच्या परिसरातील दवाखाने, शाळा, यांना त्रास होणार नाही हे

बघायला हवे. मूर्ती विसर्जनाच्या वेळी ठीक ठिकाणी तात्पुरते तळे किंवा तलाव त्या त्या ग्रामपंचायत नगरपालिका यांनी उपलब्ध करून द्यावे. उत्सवाचे काळातील मूर्तीला अर्पण केले जाणारे फुले, दुर्वा, माळ, नारळाची सोलपटे याची विसर्जन करताना खड्डे करून त्यात करावे म्हणजे इतस्थता पसरून प्रदूषण होणार नाही. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाच्या सार्वजनिकतेत जो सांस्कृतिक वैभवचा ठेवा दिला आहे त्या निमित्ताने या उत्सवात सर्व जाती धर्मांच्या लोकांची एकत्र यावे, विविध सांस्कृतिक कार्यक्रम साजरे व्हावे, स्पर्धा व्हाव्यात एकमेकात बंधूभाव, देशप्रेम निर्माण व्हावे आणि गणेशोत्सवाचे पावित्र्य कायम ठेवून लोकसंस्कार व्हावे तरच गणेशोत्सव साजरा करण्याचा हेतू साध्य होईल.

सगळे सण,उत्सव साजरे करत असताना सामाजिक भान म्हणून काही गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात. जसे कर्कश्य वाद्या पासून ध्वनी प्रदूषण, मोठे फटाके,मोठ्याप्रमाणात रोषणाई यापासून वायुप्रदुषण होणार नाही,पर्यावरण संवर्धन होईल ह्याची काळजी घ्यायला हवी.सात्विकपणे आपल्या संस्कृतीला शोभेल असेच. उत्सव साजरे करायला हवेत. कुठलेही अपप्रकार घडणार नाही,अपप्रवृत्तीचा शिरकाव होणार नाही. आणि आपण उत्साहात उत्सव साजरे करत असतांना,कोणालाही त्रास होणार नाही ही जबादारी मंडळाची आहे याचे भान ठेवायला हवे.

शासनाने जरी उत्सवासाठी निर्बंध शिथिल केले असले तरी अजूनही कोरोना संपूर्णपणे गेला नसून त्याचे रुग्ण सापडत आहेत. मुंबई पुण्यात हे सापडले आहेत तसेच मास्क लावण्याविषयी सक्ती नसली तरी आपण वैयक्तिक सुरक्षिततेच्च्या दृष्टीने ते लावले पाहिजे आणि गणेश उत्सव साजरा करण्यासाठी स्थापना ते विसर्जना पर्यंत जे काही नियम आखून दिले आहेत त्याचे पालन करुन, त्या चौकटीतच उत्सवाचा आनंद घ्यायला हवा.

# पेशवेकालीन सिन्नर (आर्थिक आणि सामाजिक)

आधुनिक केसरी

**डॉ. अंजली संजय वेखंडे लिखित पेशवेकालीन सिन्नर (आर्थिक आणि सामाजिक) हा ग्रंथ नुकताच माझ्या हाती आला. पुण्याच्या व्यतिरिक्त पेशव्यांच्या काळात सातारा, अहमदनगर, नाशिक, कोपरगांव, सांगली, कल्याण आदि अनेक महत्वाची शहरे होती. लेखिकेने "सिन्नर" हेच नगर का निवडले असावे असा प्रश्न मनात आला. पुस्तकाच्या मथळ्यावरून पेशवेकालीन सिन्नर शहराचा आर्थिक आणि सामाजिक लेखाजोखा मांडायचा आहे हे लक्षात येते. पुस्तकाच्या अंतरंगात शिरल्यावर मात्र पेशवेकालीन "सिन्नर" हे नगर का निवडले याचा उलगडा झाला. सिन्नर हे पेशवेकाळाचे प्रतिनिधित्व करणारे परगण्याचे एक ठिकाण होते. परगणे सिन्नर हे निजाम आणि मराठे राज्याच्या सीमेवरील गाव असल्याने तिथे राजकीय अस्थिरता खूप मोठ्या प्रमाणात असायची. पेशव्यांच्या प्रत्येक लढाईत सिन्नरचा सहभाग होता.**

**परीक्षण**


**व्यंकटेश देवनपल्ली**
**संपर्क क्र. : 9535022112**

मध्यंतरी "द ग्रेट डाइवर्जेंस (महान विचलन)" या विषयावर चर्चा सुरू होती. द ग्रेट डाइवर्जेंस शब्दाचा अर्थ ढोबळपणे सांगायचा झाला तर, ज्या काळात युरोपियन देशांनी सामाजिक-आर्थिक बदल दर्शवत, इतरांपेक्षा जास्त प्रगती केली आहे तो काळ. त्या काळापासून युरोप उच्च विकासाच्या मार्गावर होता. काही विद्वानांच्या मते सोळाव्या शताब्दीच्या सुरूवातीला आशिया खंडातील सर्वात संपन्न असलेले प्रांतदेखील पश्चिमी युरोपच्या मागे होते. या चर्चेनुसार, आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या भारत हा मागासलेला असा देश होता असे मानले गेले. विशेषतः सतराव्या शतकापासून भारताची आर्थिक पातळी खाली गेली होती असे म्हटले जाते. बहुधा या चर्चेला उत्तर देण्यासाठी म्हणा किंवा पेशवे हे कुशल लढवय्ये असले तरीही त्यांचे प्रशासकीय बाबींवर लक्ष कमी होते असे जे बोलले जाते. ते बोलणे कसे चुकीचे आहे हे अधोरेखित करण्यासाठीच लेखिकेने हे संशोधनाचे कार्य हाती घेतले असावे. सिन्नरसारख्या राजकीय अस्थिरता असलेल्या नगराचीदेखील आर्थिक आणि सामाजिक स्थिती किती उत्तम होती आणि प्रशासनिक यंत्रणादेखील किती परिणामकारक होती हे प्रस्तुत करणे लेखिकेला महत्त्वाचे आणि आवश्यक वाटले असावे. पुस्तकाची मांडणी करताना, अभिप्रेत असलेला विषय लेखिकेने पाच प्रकरणात विभागून संगतवारपणे मांडलेला आहे.

पहिल्या प्रकरणात सिन्नरच्या पेशवेपूर्व काळाच्या इतिहासाचा आढावा घेतला आहे. या शहराचे वर्णन करताना अनेक पौराणिक, सातवाहनकालीन, राष्ट्रकूट आणि पश्चिमी चालुक्यांचाही प्रभाव या शहरावर राहिला असल्याचे मोलाचे संदर्भ या अनुषंगाने वाचावयास मिळतात. पौराणिक काळात मौनीनाथांच्या चरित्रात सिन्नर शहराला ब्रह्मपुरी म्हटले आहे. राज्यात सातवाहनांनी जी काही शहरे वसविली त्यापैकी एक सीरीनगर म्हणजे सिन्नर होय. यानंतरच्या यादव सल्तनत, मोगल, मराठा इ. राजवटींच्या पार्श्वभूमीत सिन्नरकडे बघण्याचा प्रयत्न केला आहे. दुसऱ्या प्रकरणात मुलकी प्रशासकीय बाबींवर व परगणे प्रशासनाबद्दल विस्तृत विवेचन केले आहे. यात प्रशासकीय अधिकाऱ्यांचे हुद्दे, पगार, न्यायव्यवस्था यांचा तपशील आहे.

तिसऱ्या प्रकरणात सिन्नरच्या आर्थिक विकासावर प्रकाश टाकला आहे. राज्याचा योग्य महसूल हा कुठल्याही राज्याच्या उन्नतीचे प्रतिक असते. त्यासाठी परगण्याचा इ.स. १७०७ ते १८१८ पर्यंतचा कालावधी दरम्यानचा महसूल विचारात घेऊन, पेशव्यांच्या कार्यकाळातील महसूल व जकात व्यवस्था, भूमापन, प्रतवारी, पिकांचे प्रकार, कर व्यवस्था, जकातींबद्दल व महसुलाच्या उत्पन्नाचे स्रोत यांची माहिती तपशीलवार मांडलेली आहे. महसूलाच्या पद्धती, दर आकारणी, महसूल अधिकाऱ्यांची कार्ये, विविध प्रकारच्या पट्ट्या, दुष्काळ, जल व्यवस्थापन, व्यापार-उद्योग, सावकारी इ. बाबींचा ऊहापोह आढळून येतो. आलेखीय मांडणीद्वारे सिन्नर परगणे भागातील आर्थिक आलेख हा कसा उंचावत जाणारा होता हे लेखिकेने सिद्ध केले आहे.

चौथ्या प्रकरणात सिन्नरच्या सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक इतिहासाचा ऊहापोह केलेला आहे. मराठे, ब्राह्मण, महानुभाव पंथ, इतर जमाती, कुटुंबव्यवस्था, धार्मिक व सामाजिक रितीरिवाज, शिक्षण पद्धती, देवालये यांचे वर्णन आहे. याचबरोबर पेशवेकाळातील सामाजिक परिस्थितीचा विचार करताना जाती, चालीरीती आणि वतन या तीन मूलभूत घटकांचा विचार केला आहे. समकालीन अनेक सामाजिक बाबींच्याविषयी अभ्यासपूर्ण विवेचन आहे. या ग्रंथात सामाजिक चालीरीती, सिन्नरमधील धार्मिक स्थळे त्यांचे महत्व आणि पडणारे धार्मिक अर्थकारण विस्तृतपणे सांगितले आहे. पाचवे आणि शेवटचे प्रकरण आढावा व निष्कर्षाचे आहे. कुठलेही शहर सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक समृद्धीच्या समन्वयाने समृद्ध होते. पेशवेकालीन सिन्नर असेच वेगळेपण जपणारे शहर आहे, असे आपल्या लक्षात येते. मुस्लिम धर्मीयांचे वस्त्रोद्योगामध्ये असणारे योगदान, धातूकाम, काचकाम यामध्ये विशेषत्वाचे बांगड्यांची निर्मिती, खाटिक व्यवसाय, शेती, पानांची शेती आदी व्यवसायांनी या शहराला आर्थिक समृद्धता कशी दिली याचे विवेचन आहे. पेशव्यांच्या राजवटीत धर्म आणि सणोत्सव परंपरांना विशेष




महत्त्व असल्याने या शहरावरही मोठा प्रभाव दिसून येतो. यामुळे दसऱ्याच्या दिवशी सीमोल्लंघनासारखे उत्सव असोत किंवा देवीचे उत्सव असोत मोठ्या उत्साहाने ते येथे साजरे होत असत. याशिवाय मुस्लिम धर्मीयांचे ईद आणि मोहर्रमदेखील उत्साहात साजरे होत असत. पेशवेकाळात सर्व समाज आणि धर्म गुण्यागोविंदाने नांदत होता. या दोन्ही धर्मीयांसाठी खर्चासाठी प्रशासकीय तरतूद त्या काळात होती. याशिवाय भोजन समारंभांवरदेखील या काळात मोठा भर असलेला आढळून येतो.

सिन्नरकडे सांस्कृतिक दृष्टीने बघायचे झाल्यास शेजारीच असणाऱ्या नाशिक या तीर्थक्षेत्राचा मोठा प्रभाव या शहरावर दिसून येतो. श्री गोंदेश्वरापासून अनेक मंदिरांचे अस्तित्व यामुळे या काळात असल्याचे दिसून येते. या शहरात असणाऱ्या मंदिरांवर शैव पंथीयांचाही मोठा प्रभाव असल्याच्या खुणा पेशवेकालीन वाटचालीत पुढे येतात. पेशवेकालीन समृद्धीची परंपरा सांगणारे सिन्नर परगण्याचे अनेक संदर्भ उपलब्ध आहेत. सातवाहनांच्या काळापासून पेशव्यांच्या कालखंडातही मोठ्या प्रमाणावर सामाजिक आणि आर्थिक अभिसरणाचा वारसा या भौगोलिक परिसरास लाभला आहे. त्यामुळे सिन्नर शहराने केवळ जिल्हाच नव्हे, तर महाराष्ट्राचेदेखील प्रतिनिधीत्व केले आहे असे म्हणता येईल. पेशवेकाळात तळागाळातील गावेसुद्धा आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या किती सक्षम होती हे समकालीन कागदपत्रांच्या अभ्यासावरून आणि संशोधनाद्वारे, लेखिका डॉ. अंजली वेखंडे ह्या एखाद्या मुरब्बी वकिलाप्रमाणे आपली बाजू मांडण्यात यशस्वी ठरल्या आहेत हे मात्र निर्विवाद आहे. त्या काळातील आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती समजावून घेण्यासाठी लेखिकेने जिज्ञासेपोटी केलेले संशोधन, अभ्यास आणि अथक परिश्रम हे थक्क करणारे आहे. अगणित उपलब्ध कागदपत्रांतून आवश्यक दस्तावेज धुंडाळणे हेच मोठे जिकीरीचे काम आहे आणि तो दस्तावेज सापडल्यानंतर, त्यातील मोडी लिपीतील मजकूराचा मराठी तजुर्मा करणे हे तर महाकठीण काम आहे. हे सर्व दिव्य पार पाडत डॉ. अंजली वेखंडे यांनी हा ग्रंथ सिद्ध केला आहे. डॉ. तेजस मदन गर्गे यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना या ग्रंथाला योग्य पुष्टी देते. पुस्तकाच्या शेवटी काही महत्त्वाच्या दस्तांची छायाचित्रे, नकाशे व छायाचित्रणे देऊन उपयुक्ततेत भर टाकली आहे. संशोधनात्मक मराठी राज्याच्या इतिहासावर प्रकाश टाकणारा ग्रंथ लिहिणाऱ्या डॉ. अंजली वेखंडे यांच्याकडून अशाच ग्रंथांची अपेक्षा आहे. इतिहासप्रेमी आणि संशोधकांच्यासाठी हा दर्जेदार ग्रंथ प्रकाशित केल्याबद्दल कॉन्टिनेंटल प्रकाशनचेही अभिनंदन !

**पुस्तक : पेशवेकालीन सिन्नर (आर्थिक आणि सामाजिक)**
**लेखिका : डॉ. अंजली संजय वेखंडे, मो. ९८२३१३०८३०**
**प्रकाशक : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पृष्ठ संख्या : ३८४.**

# १० मुलांना जन्म घाला, १३ लाख रुपये मिळवा!



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**एकीकडे लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम बघता लोकसंख्येला आळा घालण्याचा विचार व नियोजन भारतासह जग करत असताना रशियाने मात्र रशियन महिलांना १० अपत्य जन्माला घालण्याचे आवाहन केले आहे. पुतीन यांच्या अजब घोषनेने रशियन समाजात खळबळ निर्माण झाली असून अनेक रशियन विचारवंतांनी व जगातील तज्ज्ञांनी पुतीन यांच्या अजब घोषणेवर टीका केली आहे.**

रशियातील पुतिन सरकारने रशियन महिलांना एक अजब ऑफर दिली आहे. करोनाकाळ आणि त्यानंतर ओढवलेल्या युक्रेन युद्धामुळे रशियाच्या लोकसंख्येत कमालीची घट झाली असून ती पुन्हा वाढवण्यासाठी पुतिन सरकारने देशाच्या महिलांना १० मुलं जन्म घाला व १३ लाख मिळवा असं आवाहन केलं आहे!

एकीकडे लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम बघता लोकसंख्येला आळा घालण्याचा विचार व नियोजन भारतासह जग करत असताना रशियाने मात्र रशियन महिलांना १० अपत्य जन्माला घालण्याचे आवाहन केले आहे. पुतीन यांच्या अजब घोषनेने रशियन समाजात खळबळ निर्माण झाली असून अनेक रशियन विचारवंतांनी व जगातील तज्ज्ञांनी पुतीन यांच्या अजब घोषणेवर टीका केली आहे.

२०२०पासून जगातील इतर देशांप्रमाणेच रशियात देखील करोनानं थैमान घातलं आहे. रशियात आत्तापर्यंत लाखो नागरिकांचा करोनामुळे मृत्यू ओढवला आहे. त्यापाठोपाठ सुरू झालेल्या युक्रेन युद्धामध्ये मोठ्या प्रमाणावर रशियन सैन्य मृत्यूमुखी पडलं. या सगळ्याचा परिणाम रशियाच्या लोकसंख्येचं संतुलन बिघडण्यामध्ये झाल्याचा दावा तेथील तज्ज्ञ मंडळी करत आहेत. एका अंदाजानुसार युक्रेन युद्धातच आत्तापर्यंत ५० हजार रशियनांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये रशियन सैन्य आणि सामान्य नागरिकांचा देखील समावेश आहे. या पार्श्वभूमीवर आता रशियन सरकारने मोठा निर्णय घेतला आहे.

गेल्या वर्षभरात रशिया आणि युक्रेन यांच्यामध्ये झालेल्या युद्धाचे अनेक परिणाम पाहायला मिळाले आहेत. या युद्धामुळे युक्रेनचं मोठं नुकसान झाल्याचं बोललं जात होतं. तसे पुरावे देखील समोर येऊ लागले होते. पण रशियाचं नेमकं किती आणि कोणतं नुकसान झालं आहे? याविषयी मात्र नेमके पुरावे फारच कमी उपलब्ध होते. आता मात्र खुद्द रशियाच्या सरकारनेच यासंदर्भात केलेल्या एका घोषणेमुळे युक्रेन युद्धात रशियाचं मोठं नुकसान झाल्याचं समोर आलं आहे.

रशियातील पुतिन सरकारने रशियन महिलांना एक अजब ऑफर दिली आहे. करोनाकाळ आणि त्यानंतर ओढवलेल्या युक्रेन युद्धामुळे रशियाच्या लोकसंख्येत कमालीची घट झाली असून ती पुन्हा वाढवण्यासाठी पुतिन सरकारने देशाच्या महिलांना आवाहन केलं आहे!

काय आहे बक्षीस?

पुतिन सरकारने जाहीर केल्यानुसार, एखाद्या महिलेने जर १० किंवा त्यापेक्षा जास्त मुलांना जन्म दिला आणि तिची सर्व १० अपत्य जिवंत असतील, तर दाव्या अपत्याच्या पहिल्या वाढदिवशी म्हणजेच दहावं अपत्यं जन्माला आल्याच्या वर्षभरानंतर त्या महिलेला १० लाख रशियन रुबल अर्थात भारतीय चलनात जवळपास १३ लाख रुपये दिले जातील, अशी घोषणा पुतिन यांनी केली आहे.

दरम्यान, रशियन सरकारच्या या योजनेवर तेथील समाजशास्त्रज्ञ आणि समाजअभ्यासकांनी टीका केली आहे. रशियन राजकारण आणि सुरक्षा तज्ज्ञ जेन्नी माथेर यांनी यासंदर्भात आपली भूमिका मांडली आहे. "पुतिन सातत्याने असं म्हणत आहेत की ज्या नागरिकांची कुटुंबं मोठी असतात, ते जास्त देशाभिमानी असतात. लोकसंख्यावाढीसाठी पुतिन सरकार फारच अधीर झाल्याचंच हे लक्षण आहे. जवळपास ३० वर्षांपासून रशिया आपल्या लोकसंख्येचं संतुलन राखण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून आज ही परिस्थिती उद्‌भवली आहे."

दरम्यान, एकीकडे रशियाच्या लोकसंख्येचं संतुलन साधण्यासाठी हे आवश्यक असल्याचं सांगितलं जात असताना दुसरीकडे १३ लाख रुपये अर्थात १० लाख रुबलसाठी कोण १० मुलांना वाढवणार? असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. या रकमेसाठी कोण १० मुलं वाढवण्याचा विचार करणार? १०वं अपत्य वर्षभराचं होईपर्यंत ही सर्व मुलं आणि त्यांचं कुटुंब राहणार कुठे? जगणार कसं? या मुद्द्याला अनेक आर्थिक, सामाजिक आणि राजकीय कंगोरे आहेत.

# नुकसानीची पाहणी की पक्षाची बांधणी ?

## उस्मानाबाद जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा सवाल



आधुनिक केसरी न्यूज

### शिंदे गटातील आरोग्यमंत्र्यांच्या मतदारसंघात ठाकरे गटातील खासदारांसोबत पदाधिकाऱ्यांचा पीक पाहणी दौरा

**सचिन कोरडे**

**उस्मानाबाद :** गेला पंधरवड्यात महाराष्ट्रसह जिल्ह्यात पावसाचा खूपच प्रकोप झाला आहे. शेकडो हेक्टर शेतामधील पिके पावसामुळे व कीड रोगग्रस्त असताना, अचानकच ठाकरे गटातील पुढाऱ्यांना आपआपल्या मतदारसंघातील सोयाबीन पिकाची चिंता भासू लागली आहे की, कार्यकर्त्यांची बांधणी सुरू आहे. हेच पाहणीसाठी आलेल्या पुढाऱ्यांबाबत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमधून बोलले जात होते.

जिल्ह्यामध्ये उडीद, मूग, सोयाबीन, कापूस, तूर पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. बहुतांश खरिपांची पिके काही ठिकाणी पाण्यांमुळे तर काही ठिकाणी रोगांमुळे तर अनेक ठिकाणी गोगलगायमुळे नष्ट झालेली आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये पाच लाख 52 हजार हेक्टरवर सोयाबीन पिकाची पेरणी झालेली आहे.

कृषी विभागाने केलेल्या सर्वेक्षणाचा प्राथमिक अंदाजानुसार आज घडीला सर्वात जास्त उस्मानाबाद तालुक्यातील सोयाबीनपिकांचे नुकसान झालेले आहे.

गेल्या सात आठ वर्षांपूर्वी ऊस तोडणीसाठी बळीराजाची होणारी धावपळ, शेतातच पडून राहिलेला ऊस किंवा कारखानदाराकडे उसाच्या बिलाअभावी थेटे मारून उंबरे झिजवणारा बळीराजा यांना आजपर्यंत का आठवला नाही. आजच या पुढाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या पिवळ्या पडलेल्या सोयाबीनसाठी कंबर कसली की पक्ष बांधणीसाठी कंबर कसली हेच शेतकऱ्यांना कळायला मार्ग नाही.

कारण गेल्या अडीच वर्षांपूर्वी युतीचे सरकार असताना या उस्मानाबाद जिल्ह्याचे पालकमंत्री आज शेतावर आलेल्या ठाकरे गटाच्या पुढाऱ्यांचे जवळचे मित्र होते.

त्यावेळीही शेतकऱ्यांच्या सोयाबीनच्या गंजी च्या गंजी परतीच्या पावसाने डोळ्यासमोरून वाहून गेले.

त्यावेळेस पालकमंत्र्यांसह त्यांच्या पुढाऱ्यांना आपल्या मतदारसंघाचा पाहणी दौरा करावा किंवा शेतकऱ्यांना शासनाकडून भरघोस मदत मिळण्यासाठी पुढाकार घ्यावा असेही प्रश्न मनातून शेतकरी बांधव आलेल्या पुढाऱ्यांकडे व खासदाराकडे पाहतच ऊभा होता.

शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यावरच दौरे आठवतात का? पाहणी दौऱ्यातून शेतकऱ्यांच्या दुःखावर मलमपट्टी होते की आश्वासनाचे गाजर दाखवून मीठ चोळले जाते हेच कळायला मार्ग नाही. शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाणी दौरे करणाऱ्या पुढाऱ्यांच्या स्वतःच्या कारखान्याचा बॉयलर पेटत नाही अन् शेतकऱ्यांच्या चुली काय पेटवणार? असाही प्रश्न संतप्त महिला शेतकऱ्यांच्या मनात कायम घर करून होता.

# देव्हारी गावातील तलाव शंभर टक्के भरले !

## ग्रामीण भागातील भरलेल्या तलावाकडे पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष; तलाव फुटण्याचे धोके

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** एक ते सव्वा महिन्यापासून संपूर्ण राज्यामध्ये दमदार पाऊस पडत आहे. नदी- नाले, डोंगर-दऱ्या खळखळून वाहू लागले आहेत, तर अनेक लहान-मोठे प्रकल्प ओसंडून वाहू लागले आहे. काही भागातील मोठमोठी धरणे पाण्याने शंभर टक्के भरलेले असून, धोका होवू नये म्हणून पाण्याचा विसर्ग केला जातो. संबंधित पाटबंधारे विभागाचे कर्मचारी हे घटनास्थळी दाखल होऊन भरलेल्या धरणाची पाहणी करतात व पूर्वसूचना देवून गेट उघडतात.

परंतु देव्हारी भागातील परिस्थिती मात्र यापेक्षा वेगळी आहे. ग्रामीण भागातील अनेक भागांमध्ये सावळदबारा परिसरामध्ये



जसे, छोटे-मोठे तलाव कार्यरत आहेत. यामध्ये बंधारे असतील, महालक्ष्मी तलाव, सावळदबारा भागातील देव्हारी गावातील तलाव, या भागातील मध्यभागी असलेला तलाव, अशा अनेक लहान-मोठे तलाव आज रोजी शंभर टक्के भरलेले आहेत. पाण्याच्या सांडवासुद्धा वाहत आहे. तरीपण शंभर टक्के तलाव भरल्यामुळे आणि दोन ते तीन महिने अजूनही पावसाळा बाकी असल्यामुळे या तलावाला धोका उद्भवू शकतो. देव्हारी येथील तलाव शंभर टक्के भरलेले आहेत. तलावसुद्धा पूर्ण क्षमतेने भरलेला आहे. या भागातील तलावाकडे पाटबंधारे विभागातील कर्मचारी हा तलाव कोणत्या स्थितीत आहे, त्याची पाणी साक्षवण क्षमता किती आहे, किती पाण्याचा विसर्ग करावा लागेल याकडे पूर्णपणे डोळेझाक करताना दिसत आहेत. आणि म्हणून ग्रामीण भागातील तलाव फुटण्याचे प्रमाण वाढत आहे. मांगे चिखली तालुक्यातील आमखेड येथील तलाव असेल, शिंदी येथील तलाव असेल अशी अनेक उदाहरणे आपल्याला देता येतील. याकडे पाटबंधारे विभागाने पूर्णपणे डोळेझाक केली होती आणि आताही ग्रामीण भागातील छोटे-मोठे तलाव पूर्ण क्षमतेने भरले असून ग्रामीण भागातील तलावाकडे पाटबंधारे विभागाने लक्ष देऊन नागरिकांना सुरक्षिततेचे हमी द्यावी, की तलावाला कुठल्याही प्रकारचा धोका उद्भवणार नाही.

# भाकपच्या शहर सचिवपदी ॲड. अभय टाकसाळ

## सहसचिवपदी कॉ. जॅक्सन फर्नांडीस

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या त्रैवार्षिक शहर अधिवेशनात निवडलेल्या शहर कौन्सिलकडून ॲड. अभय टाकसाळ यांची शहर सचिवपदी, तर कॉ. जॅक्सन फर्णांडीस, कॉ. अनिता हिवराळे, कॉ. माया भिवसने यांची सहसचिव पदी निवड करण्यात आली.

याबाबत असे की प्रत्येक तीन वर्षांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे शाखा परिषदा ते राष्ट्रीय महाधिवेशन घेतले जाते. याचाच एक भाग म्हणून औरंगाबादेतील सर्व शाखांच्या परिषदांनंतर 15 ऑगस्ट रोजी शहर अधिवेशन घेण्यात आले. या अधिवेशनात 21 जणांची शहर कौन्सिल निवडण्यात आली. या नूतन शहर कौन्सिलची बैठक नुकतीच झाली. यात 9 जणांची कार्यकारीणी निवडण्यात आली. या कार्यकारीणीत ॲड. अभय टाकसाळ, कॉ. जॅक्सन फर्णांडीस, कॉ.अनिता हिवराळे, कॉ.मनिषा भोळे, कॉ. विकास गायकवाड, कॉ. सुरेश ठोंबरे, प्रविण घाटविसावे, कॉ. माया भिवसने, कॉ. नारायण भागवत यांची निवड झाली, तर शहर सचिव म्हणून ॲड. कॉ. अभय टाकसाळ यांची तर शहर सहसचिव म्हणून कॉ. जॅक्सन फर्णांडीस, कॉ. अनिता हिवराळे, कॉ.माया भिवसने यांची सहसचिव पदी निवड करण्यात आली. ही बैठक जिल्हा सचिव कॉ. अश्फाक सलामी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. नूतन कार्यकारीणीला 6 वर्ष शहर सचिव राहीलेले मावळते शहर सचिव भास्कर लहाने यांनी व 3 वर्ष सहसचिव राहीलेले कॉ मधुकर खिल्लारे व कॉ वसुधा कल्याणकर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी कॉ अभय टाकसाळ यांनी महागाई, बेरोजगारीने जनता त्रस्त असताना पक्षाने संघर्षाची धार वाढवली पाहीजे आणि रस्त्यावर उतरले पाहीजे. त्यासाठी व पक्षाच्या विस्तारासाठी सज्ज होण्याचे आवाहन केले. कॉ अभय टाकसाळ यांनी गेल्या तीन वर्षात जिल्हा सहसचिव पदाची जबाबदारी सांभाळली होती. काम करणाऱ्या कॉम्रेडला कम्युनिस्ट पक्षात नेहमीच वाव असल्याने गेल्या 6-7 वर्षापासून सतत कार्यरत असणारे तन्जिम-ए-इन्साफचे कार्यकर्ते कॉ. जॅक्सन फर्णाडीस, महिलांना संघटीत करणाऱ्या कॉ.अनिता हिवराळे व सिडको विभागातून कॉ. माया भिवसने यांना संधी देण्यात आली आहे. 29 ऑगस्ट 022 रोजी भाकपचे औरंगाबाद जिल्हा अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे.



ॲड. अभय टाकसाळ

# जुन्या वादातून युवकाचा खून

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** आर्णी शहरातील माहुर रोडवरील तुफान हॉटेलसमोर जुन्या वादाचा वचपा काढत ५० वर्षीय इसमाने एका युवकावर दगडाने प्राणघातक हल्ला केल्याची घटना दिनांक २२ ऑगष्टला रात्री ११ च्या दरम्यान घडली. सदर हल्ल्यात युवकाचा मृत्यू झाला आहे. सदर घटनेने आर्णी शहरात एकच खळबळ उडाली आहे. रिजवान बेग कय्युम बेग (वय वर्ष ३९), रा. मुबारकनगर, आर्णी असे मृतक युवकाचे नाव आहे. तर सैयद बाबु सैयद गफुर (वय ५० वर्षे), रा. महाकाली मंदिरजवळ, मोमीनपुरा, आर्णी असे हल्ला करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. आर्णी शहरासह तालुक्यात हत्येच्या घटना थांबण्याचे नाव घेत नसल्याचे चित्र दिसत आहे.

शहरातील तुफान हॉटेल वर आरोपी सैयद बाबु सैयद गफुर, रा. महाकाली मंदिरजवळ मोमीनपुरा, आर्णी व हॉटेलचालकाचा भाचा मृतक रिजवान बेग हे दोन्ही हॉटेलवर काम करीत असताना दोघांमध्ये मोबाईल चोरल्याचा कारणावरून वाद झाला. त्यानंतर हॉटेल मालकाने सदर वाद सोडविला व आरोपीला घरी पाठविले. मृतक हा रात्री ११ च्या दरम्यान हॉटेलवर बाहेर निद्रावस्थेत असताना आरोपी वचपा काढण्याचा उद्देशाने परत आला व मृतकाच्या डोक्यावर फाडीने तब्बल ६ वेळा वार केले. सदर हल्यात मृतक रिजवान हा गंभीर जखमी झाला. त्याला तात्काळ ग्रामीण रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला पुढील उपचाराकरिता यवतमाळ येथे हलविले. परंतु त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला सावंगी मेघे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला. सदर घटनेची माहिती आर्णी पोलिसांना मिळताच एपीआय गणपत काळूंसे, पीएसआय किशोर खंदार यांनी घटना स्थळ गाठून पांचाना केला. उप विभागीय पोलीस अधिकारी आदित्य मिरखेलकर यांनीही घटना स्थळी भेट देऊन पाहणी केली. आर्णी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून न्यायालयात हजर केले. न्यायालयाने आरोपीला दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# 'हर हर महादेव'च्या गजराने दुमदुमली उल्कानगरी



आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** चौथ्या श्रावण सोमवारी शहरातून सकाळी साडेआठ वाजता धर्मवीर कावड संघाच्या वतीने विरज धारतीर्थ येथून कावडयात्रा काढण्यात आली. धारतीर्थचे पवित्र जल घेऊन शहरातून कावडयात्रा निघाली. यावेळी हर हर महादेवच्या गजराने उल्कानगरी दुमदुमली.

नगर परिषदेजवळ स्वामी मित्र मंडळाच्या वतीने कावडधारी शिवभक्तांना चहा, पाणी व फराळाचे वितरण करण्यात आले. शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव प्रकाश मापारी, नगरपरिषदेचे गटनेते भूषण मापारी, युवासेनेचे तालुकाध्यक्ष गजानन मापारी यांनी कावडमधील शिलिंग व महादेव मूर्तीचे पूजन केले. सुबोध संचेती, दिनेश पुरोहित, दर्शन शर्मा, अथर्व कानिटकर, मनोहर खरात, धोंडू पुरोहित, राहुल मापारी, सुनील मापारी, ऋषिकेश मापारी यावेळी उपस्थित होते. विनायक चौकात शिवछत्र मित्र मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांच्या वतीने विधिवत कावडचे पूजन करण्यात आले. फराळ व चहा वाटप करण्यात आला. मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर मापारी, डॉ. राजेश मुंददा, शंतनु मापारी, संजय वायाळ, राहुल मापारी,योगेश मापारी, अरुण गीते, पांडुरंग मुंडे, दीपक सरकटे, दत्ता भगत, गोपाल मापारी,पंकज नागरे, दत्ता दुधमोगरे, रवी कळसाईट उपस्थित होते. पत्रकार संघाचे उपाध्यक्ष तथा शिवसेना कार्यकर्ते संदीप मापारी यांच्या वतीने चहा व उसळचे वाटप करण्यात आले. यावेळी राहुल मापारी, पत्रकार संघाचे अध्यक्ष शेख समद शेख अहमद, प्रवक्ता राहुल सरदार, गोपाल तोष्णीवाल, राजेश बोरा, तुळशीदास पसरटे, बाळू सरदार यांनी कावडयात्रेचे स्वागत केले. गायखेडमार्गे पळसखेड येथील महादेव मंदिरात महाआरती करून कावडयात्रेचे विसर्जन करण्यात आले

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## हार्मोन्स - पुरुष आणि स्त्री...

आधुनिक केसरी

**टेस्टोस्टेरॉन :** पुरुषांमध्ये टेस्टोस्टेरॉन नावाचे हार्मोन्स असतात. ज्यामुळे पुरुषांमध्ये लैंगिकता घडते, याला आपण कामभावनेचे हार्मोन्स असं देखील म्हणू शकतो. ज्यामुळे कामभावना निर्माण होण्याची प्रक्रिया घडते. हे हार्मोन्स अंडाशयामध्ये तयार होतात आणि काही प्रमाणात ॲडरिनल ग्लैंडमधे बनतात. मेंदूमधील हायपोथैलेमस व पिट्युटरी ग्रंथी टेस्टोस्टेरोनच्या निर्मितीवर नियंत्रण ठेवतात.

या हार्मोनमुळे पुरुषांमधील लैंगिक विकास वाढीला लागतो. त्याचा लाभ निश्चितपणानं लैंगिक क्रिया करताना होतो. तसेच एकाग्रता, मूड, स्मरणशक्ती यावर सुद्धा टेस्टोस्टेरॉनचा प्रभाव पडत असतो, टेस्टोस्टेरॉनच्या माध्यमातूनच शुक्राणू तयार होत असतात स्त्रियांमध्ये मात्र याचं प्रमाण फार कमी असतं. आता पाहूया या टेस्टोस्टेरॉनशी शरीरातली पातळी जर कमी झाली तर काय होतं ? या हार्मोन्सच्या कमतरतेमुळे चिडचिडेपणा, कामशक्ती कमी होणे, कामेच्छा न होणे या बरोबरच नपुंसकता, शुक्राणूंची संख्या घटणे, हॉट फ्लॅशेस, नैराश्य, नितंबांचा आकार वाढणे, हाड ठिसूळ होणे अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागतं.

आता या समस्यांवर सुद्धा निश्चत उपचार करता येतो. ज्याला वैद्यकीय भाषेमधये टेस्टोस्टेरॉन थेरपी असं म्हटलं जातं. आधुनिक उपचारांची मदत घेऊन शरीरातील टेस्टोस्टेरॉनची पातळी वाढवता येते. यामध्ये हाताचा दंड, खांदा किंवा पोटावर औषधी जेल लावणे, अंडाशय किंवा शरीरावर स्कीन पेंच लावणे, २ किंवा ३ आठवड्यांतून एकदा इंजेक्शन घेणे असे उपचार केले जातात. नैराश्यासाठी वेगळी उपचार पद्धती आहे. स्त्रियांमध्ये पाळीनंतर कामेच्छा कमी होत असेल तर टेस्टोस्टेरॉन थेरपी दिली जाते.

**लो टेस्टोस्टेरॉन :** नैसर्गिकरीत्या वाढत्या वयानुसार हे कमी होतात पण किती ते नक्की नसते. सायंकाळी याची लेव्हल कमी होते यामुळे काय होते ? **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# मुन्नासेठ संघ यांच्याकडून आसोली गोरक्षण संस्थेला १६ हजार रुपयांची देणगी

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** येथील प्रसिद्ध व्यापारी जैन सन ऑटोचे संचालक मुन्नासेठ संघई यांनी तालुक्यातील आसोली येथील गोरक्षण संस्थेला पत्नीच्या स्मृतिप्रीत्यर्थ १६ हजार रुपयांची देणगी दिली. या गोरक्षण संस्थेमध्ये सध्या ५०० च्या वर जनावरे असून त्यांच्या चाऱ्या पाण्यासाठी मोठा खर्च होत असतो. सदरील गोरक्षण संस्थेला मोठ्या प्रमाणात चाऱ्याची आवश्यकता भासत असते. याकरिता अनेक दानशूर व्यक्ती आपापल्या परीने देणग्या प्रदान करीत असतात. मुत्रासेठ संघई यांच्या पत्नी सौ. किरणदेवी संघई यांचे नागपूर येथे उपचारादरम्यान नुकतेच निधन झाले होते. या अगोदरही मुन्नासेठ संघई यांनी या गोरक्षण संस्थेला सपत्नीक जाऊन अनेकवेळा देणग्या दिल्या होत्या. त्यांच्या पत्नीचे निधन झाल्यानंतर धार्मिक विधी पार पडल्यानंतर त्यांनी गोरक्षण या संस्थेला देणगी प्रदान केली. याप्रसंगी संचालक पांडे बंधू व पत्रकार दीपक महाडीक हे उपस्थित होते.



काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in